# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २२/१२/२०१०**

आज बुधवार दि. २२/१२/२०१० (दि. १६/१२/२०१० रोजीची तहकुब सभा) रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०९ दि. ०६/१२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १२) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १६) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १७) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १८) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २२) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २५) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३०) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३१) | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | सदस्या |
| ३२) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३३) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३५) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३७) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३८) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३९) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४०) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४१) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४३) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४४) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४५) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४६) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४७) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४८) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४९) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५१) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५२) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५३) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५४) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५५) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५६) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५७) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५८) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६०) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६१) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६२) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६३) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६४) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६५) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६७) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६८) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| २) | पाटील मिलन गोविंदराव | विरोधी पक्षनेता |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ५) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ६) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ७) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ९) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| १०) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ११) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| २) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ३) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा गुरुवार दि. १६/१२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. ६३ ते ८२ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार दिनांक २२/१२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. मा.

महापौरांच्या परवानगीने, आपल्या शहरातील ज्यांना "शिल्पगरु" असा राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे, श्री. ब्रम्हदेवराव पंडीत यांचा सभागृहाच्यावतीने सत्कार आयोजित करण्यात आलेला आहे. मी त्यांना सभागृहात येण्याची विनंती करतो. त्यांना एकूण मिळालेल्या पुरस्कारांची यादी वाचन करतो. आणि आत्ताचा नवीन मिळालेला सन २००८ ते २०१०, वस्त्र मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून शिल्पगुरु हा केंद्र शासनाकडून मिळणारा राष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळालेला आहे या पुरस्काराचे स्वरुप आहे, गोल्ड मेडल, ताम्रपद आणि सहा लाखाचा धनादेश असा त्यांना पुरस्कार मिळालेला आहे. मी श्री. ब्रम्हदेवराम पंडीत यांना डायसवर येण्याची विनंती करतो आहे. त्यांचा मा. महापौर पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह आणि शाल-श्रीफळ देऊन सत्कार करणार आहेत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

असे रत्न आपले शहरामध्ये आहेत ही आपल्याला अभिमानाची गोष्ट आहे. सहा लाखाचा धनादेश त्यांना शासनातर्फे मिळालेला आहे.

**स्नेहा पांडे :-**

बहोत बधाई। आज आपको नॅशनल अवॉर्ड मिला है। ऐसी कामना करती हू की, आगे आपको ऐसे इंटरनॅशनल अवॉर्ड मिलते रहे और मा. आयुक्त साहब आपने मेरे पत्र का मान रखकर इस सभा मे सत्कार किया इसके लिए मै आपको भी धन्यवाद व्यक्त करती हू। श्री. पंडीतजी को फिर से बहोत बहोत शुभेच्छा देती हू। ऐसे रत्न अपने मिरा भाईंदर मे है। इस रत्न को हमारी भारतीय जनता पार्टी के सभी नगरसेवकों के तरफ से, पुरी पार्टी के तरफ से आपको बधाई देती हू।

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११.५० झालेले आहेत.

**अनंत पाटील :-**

मी अभिनंदनाचा ठराव मांडतो. मिरा भाईंदर महानगरपालिका पोटनिवडणूक-२०१० प्रभाग क्र. ४५ मधुन श्रीम. संध्या प्रफुल्ल पाटील विजयी झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका पोटनिवडणूक-२०१० प्रभाग क्र. ४५ मधुन श्रीम. संध्या प्रफुल्ल पाटील विजयी झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनंत पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत पालांडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अभिनंदन ठराव क्र. ६३ :-**

आपल्या शहरातील ज्यांना "शिल्पगरु" असा राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे, श्री. ब्रम्हदेवराव पंडीत यांचा सभागृहाच्यावतीने सत्कार आयोजित करण्यात आलेला आहे. मी त्यांना सभागृहात येण्याची विनंती करतो. त्यांना एकूण मिळालेल्या पुरस्कारांची यादी वाचन करतो. आणि आत्ताचा नवीन मिळालेला सन २००८ ते २०१०, वस्त्र मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून शिल्पगुरु हा केंद्र शासनाकडून मिळणारा राष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळालेला आहे या पुरस्काराचे स्वरुप आहे, गोल्ड मेडल, ताम्रपद आणि सहा लाखाचा धनादेश असा त्यांना पुरस्कार मिळालेला आहे. तरी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- सौ. स्नेहा पांडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आता सभागृहामध्ये आपण एक परिपत्रक दिलेले आहे. बहुतेक हे परिपत्रक आपल्या अधिका-यांनी किंवा कुठल्याही पदाधिका-यांनी वाचले नसावे. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आहे. यामध्ये तुम्ही कुठलाही सत्कार समारंभ करताना त्या सभेमध्ये आपण जे पुष्पगुच्छ आणणार त्यामध्ये प्लास्टीकचा वापर होऊ नये आणि प्लास्टीकच्या ठिकाणी एक वृक्ष आणि एक फुल देऊन त्यांचा सत्कार करावा. आत्ता सत्कार झाला त्याचे अभिनंदन आम्ही मांडलेले आहे. पण याची खबरदारी यानंतर या सभागृहाने

ठेवावी. आपण जी.आर. देतो पण त्या जी.आर. चे पालन होत नाही. आत्ता सभागृहामध्ये दिले आणि आपण शासनाच्या नियमाचा धुज्जा उडवतो आहे.

**नगरसचिव :-**

तशी नोंद घेतली जाईल.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये प्लास्टीकचा वापर कमी करण्यासाठी गव्हर्नमेंटने सजेशन केलेले आहे. यापुढे ती दक्षता घेऊ. फक्त फुलांचाच गुच्छ आणत जा. प्लास्टीक आणू नका.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, फुलेसुध्दा वापरता येणार नाहीत. एकच फुल द्यायचे आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आत्ता आपले सन्मा. सदस्य बोलले की, प्लास्टीकचा वापर करायचा नाही. मला वाटते प्रत्येक ठिकाणी सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गारोडिया हे आपल्या पक्षांच्या नेत्यांकडे जाताना याच्यापेक्षा मोठे प्लास्टीकचे गुच्छ घेऊन जातात. त्यांनी अगोदर त्याचे पालन केलेले आहे का? त्यांनी असे दाखवावे की, आम्हीपण........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे शासन परिपत्रक आहे. शासनाने दिलेले आहे की, अंमलबजावणी करावी. मी असे बोललो नाही. कोणी करणार, नाही करणार तो त्यांचा लुकआऊट आहे. शासन त्याच्यावर काय कारवाई करावी त्याचा याच्यामध्ये उल्लेख आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी सभेमध्ये भरपुर विषय आहेत. एक दुर्घटना घडलेली आहे. आपल्या एका नगरसेविकांचे पती पण वारलेले आहेत. तेव्हा लवकरात लवकरत विषय संपवून बऱ्याच जणांना त्या विधीला जायचे आहे. तेव्हा नको त्या विषयावर इकडे चर्चा करु नका.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आत्ता मा. उपमहापौर साहेब बोलले त्यापध्दतीने मी ही सुचना करतो. आपल्या सन्मा. नगरसेविका श्रीम. उमा सपार यांचे मिस्टर श्री. विश्वनाथ सपार यांचे आज पहाटे साडेसहा वाजता पुण्यामध्ये निधन झाले. चार वाजता त्यांची अंतयात्रा निघणार आहे. तेव्हा मी आपल्याला एवढीच विनंती करतो की, विषय थोडेसे लवकरात लवकर झाले तर आम्हाला काही नगरसेवकांना पुण्याला निघायचे आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. नगरसेविका मॅडमना विनंती करतो की, आपल्या प्रश्नोत्तराचा तास आहे. परंतु हा प्रश्न जर आपण पुढच्या मिटींगमध्ये घेतला तर बऱ्याच जणांना त्या अंतयात्रेला जायचे आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

चालेल.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही पण त्या दुःखामध्ये सहभागी आहोत. आपल्याला एकंदर वाटत असेल तर आपण सभा तहकुब करावी. आमची काही हरकत नाही. विषयपत्रिकेवर महत्वाचे विषय आहेत. त्यादिवशी मा. आयुक्त नसताना आपण सभा यासाठी तहकुब केली होती की, महत्वाचे विषय आहेत. त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे. मा. आयुक्त साहेब त्यादिवशी नागपुरला होते म्हणून रद्द केली आणि आज आपण सांगता की, लवकर करा. सभेचे कामकाज सभेच्या कामकाजाप्रमाणे चालले पाहिजे. आपल्याला अशी विनंती आहे की, आम्हाला आमचे मुद्दे व्यवस्थित मांडू द्या आणि तरीही वाटत असेल तर आम्ही त्याला सहमत आहोत. आपण तहकुब करावी. उद्या परवा घ्यावी.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

अंतयात्रेला संध्याकाळ होणार आहे. तेव्हा आपण जेवढे विषय घेता येतील तेवढे घेऊ या.

**नरेंद्र मेहता :-**

विषयाच्या अनुषंगाने चर्चा करणार. त्यापुढे आम्हीही करणार नाही. प्रश्न तासाचे ते गेल्या तीन महिन्यांपासून वाट बघतात की, आमचा प्रश्न कधी येणार. आज आलेला आहे. आपण तो परत पुढे ढकलला. परत एक दोन महिने जाणार.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांनी मान्य केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांचा जो काही प्रश्न आहे तो पूर्ण सभागृहाशी आहे. त्यांचा व्यक्तीगत प्रश्न नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आम्ही ते घेऊ नका असे म्हणतच नाही. पुढच्या सभेमध्ये घेऊ असे सांगितले आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६३, दि. ११/०२/२०१० व २४/०२/२०१० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, लक्षवेधी आलेली आहे का?

**नगरसचिव :-**

लक्षवेधी पुढे सांगितली.

**शरद पाटील :-**

लक्षवेधी असेल तर तुम्ही लक्षवेधी घ्या. चांगला विषय असेल तर लक्षवेधी घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

लक्षवेधीसुध्दा पुढच्या मिटींगमध्ये घेणार. कारण आपण तिकडे प्रश्नोत्तराचा तास रद्द केलेला आहे.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

माझी लक्षवेधी आहे. त्यांना जर वाटत असेल की, महत्वाची नाही. आमची काही हरकत नाही. आमची लक्षवेधी आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

महत्वाची नाही असे म्हणणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

माझी लक्षवेधी आहे ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

होय आहे. आपण पुढच्या वेळी विचार करु.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्या लक्षवेधी बद्दल तुम्ही त्यांना विचारणार आहात का?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

अगोदर कोणाची लक्षवेधी आलेली आहे?

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, कोणाकोणाची लक्षवेधी आहे?

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना लक्षवेधी नाही पण आम्हाला लक्षवेधी पाहिजे. महत्वाची आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांची स्विकारलेली लक्षवेधी आहे.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**शरद पाटील :-**

लक्षवेधी फेटाळायची असेल तर ज्यांच्या लक्षवेधी आहेत त्यांना तुम्ही विचारले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

फेटाळत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

लक्षवेधी फेटाळलेली नाही.

**शरद पाटील :-**

फेटाळली नाही तरी जर तुम्ही पुढे घेता तर त्यांना विचारायला पाहिजे ना?

**प्रविण पाटील :-**

आम्ही मान्य करत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, जर त्यांची फेटाळली असेल तर नियमाप्रमाणे दुसरी चर्चेला घ्यायला पाहिजे ना?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ती फेटाळलेली नाही पुढे घेतलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ती पुढे ढकलली. त्यांची इच्छा नसेल. मग यांची चर्चेला येऊ द्या. सचिव साहेब, नियम काय आहे ते तुम्ही सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांची लक्षवेधी तुम्ही पुढे घेत असाल तर आमची हरकत नाही. तुम्ही दुसरी घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

पुढे घेतली त्याचे सक्षम कारण आहे. ते कारण आपल्याला गंभीर वाटत नाही का?

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही तर त्यांच्यापेक्षा जास्त गंभीर बोलतो. आपण सभा तहकुब करा.

**मा. महापौर :-**

प्रोसीजर प्रमाणे दोन लक्षवेधी आल्या होत्या एक लक्षवेधी आम्ही घेणार होतो.

**नरेंद्र मेहता :-**

कुठली घेणार होते?

**मा. महापौर :-**

श्री. जुबेर इनामदार यांची.

**नरेंद्र मेहता :-**

आपण घेतली का?

**मा. महापौर :-**

त्याच्यात अतिशय महत्वाचा विषय होता तरीसुध्दा ती पुढच्या मिटींगला घेण्यात येईल.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही दुसरी फेटाळली ना?

**मा. महापौर :-**

दुसरी फेटाळली.

**भगवती शर्मा :-**

मग ते सांगा की, दुसरी फेटाळली.

**जुबेर इनामदार :-**

विषयपत्रिकेवरचे विषय सुरु करा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. उपमहापौर साहेब, आपण आत्ता बोलता की, अतिमहत्वाची लक्षवेधी होती. आत्ता जर हे विषय अतिमहत्वाचे आहेत तर लक्षवेधी अति महत्वाची आहे आणि तुम्ही ती घ्यायला पाहिजे. शेवटला तुम्ही विषय घेणार ना.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, नियम काय सांगतो ते तुम्ही बोला.

**नगरसचिव :-**

त्यांची लक्षवेधी पहिली आलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ती चर्चेला नाही म्हणतात तर दुसरी घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

ज्यांची लक्षवेधी आहे त्यांनीच विचार करावा.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, दोन लक्षवेधी आल्या होत्या. आपला नियम काय आहे? माझी लक्षेवधी प्रथम आहे मी ती मागे घेतो. फेटाळत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मागे घेतली तर दुसरीवर चर्चा व्हायला पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, माझी तुम्हाला विनंती आहे की, ती लक्षवेधी पुढच्या मा. महासभेमध्ये चर्चे करिता आणा.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, मानवता धर्म के हिसाब से जो हम सबको पुना जाना है। ऐसी चर्चा मे टाईम चला जाएगा। विषय चलाइए।

**नगरसचिव :-**

मिनिटस् वाचून पूर्ण झालेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मला एक सांगा. मा. उपमहापौरजींनी सांगितले की, आम्ही जे काही बोलणार विषयाच्या अनुषंगाने बोलणार. पहिली लक्षवेधी आपण स्विकारली आणि पुढच्या मिटींगमध्ये घ्यायची असे ठरले. तर दुसरी लक्षवेधी राहिलेली आहे.....

**भगवती शर्मा :-**

दुसरी लक्षवेधी तुम्ही फेटाळली की नाही?

**नरेंद्र मेहता :-**

दुसरी फेटाळली आणि पहिली नंतर, असे होते का?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. माजी महापौर साहेब, दोन लक्षवेधींमध्ये एक लक्षवेधी स्विकारली. याचा अर्थ दुसरी फेटाळली गेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

स्विकारली तर चर्चेला कुठे आहे.

**प्रभात पाटील :-**

ज्यांची लक्षवेधी फेटाळली त्यांनी आज जे कारण घडले त्या निमित्ताने तरी......

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

मग पूर्ण सभा तुम्ही अशीच चालवणार आहात की, आम्हाला जायचे आहे. आम्हाला जाऊ द्या.

**प्रभात पाटील :-**

सभा चालेल.

**प्रशांत पालांडे :-**

सभा नंतर घ्या ना.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेबांना निवेदन आहे की, आपण सभा तहकूब करावी आणि दोन दिवसानंतर घ्यावी.

**जुबेर इनामदार :-**

विषय पत्रिकेवरचे विषय सुरू करण्यात आलेले आहेत. सचिव साहेब, आपण विषय सुरू करा.

**प्रभात पाटील :-**

दि. ११/०२/२०१० व २४/०२/२०१० रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे. सचिव साहेब विषय के पहले मा. महापौर साहेब के परवानगी से, दि. ३०/०७/२०१० को इस मा. महासभा के अंदर एक ठराव हुआ था। उसका विषय था, मालमत्ता करात वाढीव किया था जिसके अंदर ८ टक्के रस्ता कर का था। और ८ टक्के पाणी पुरवठा लाभकर का था। जिस ठराव को इस सभा ने मान्यता दी थी। इसकी अंमलबजावणी के लिए जो ८ टक्के रस्ता कर था, इसकी अंमलबजावणी की जा चुकी है। और ८ टक्के जो पाणी पुरवठा लाभकर का था वह अभी तक बिलों को अंदर नही की गयी है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काय चर्चा चालू आहे? आत्ता वेळ जात नाही?

(सभागृहात गोंधळ )

**भगवती शर्मा :-**

इसकी अंमलबजावणी क्यों नही की गयी?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता वेळ जात नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, विषयावर चर्चा होऊ द्या.

**प्रभात पाटील :-**

एनसीपी चे गटनेते जे काही बोलतात, यांनी जी सुचना मांडलेली आहे, मी सुध्दा तुम्हाला निक्षून सांगते, सभागृहाला गृहीत धरून सांगते की, यांच्या ठरावाची अंमलबजावणी होत नाही. या शहरावर लागलेला कराचा बोजा रद्द होत नाही, तोपर्यंत ही सभा चालू देणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर, ३०/७/२०१० रोजी झालेला ठराव, त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे.

**प्रभात पाटील :-**

नागरिकांच्या डोक्यावर जे कराचे ओझे आहे ते कमी झाले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही मा. आयुक्तांना सुचना करून सुध्दा याची अंमलबजावणी झालेली नाही.

**प्रभात पाटील :-**

कशासाठी करायचे हे ठराव? हा ठराव झाला आहे. आणि तरीसुध्दा करवाढ झालेली आहे. ठरावाप्रमाणे अंमलबजावणी झाल्याशिवाय सभा चालणार नाही.

**भगवती शर्मा :-**

सदनामध्ये झालेला निर्णय आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

जर ठराव झालेला होता, तर अंमलबजावणी का झाली नाही? मा. आयुक्त साहेब, तुम्ही निवेदन करा.

**मा. महापौर :-**

ठराव क्र. ६८, दि. ३०/०७/२०१०, रस्ता कर व पाणी पुरवठा कराची आकारणी करू नये असा ठराव पारित झाला होता. २००७-२००८, सन २००९ आणि १० या वर्षाकरिता शांती नगर, जेसल पार्क, सृष्टी या नागरिकांना विशेष कर १३ टक्के दराने लावण्यात आला होतो. तरी सन २०१०-११ पासून ८ टक्के दराने लावण्यात यावा असे या ठरावात नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे वर नमुद केलेल्या सुचनेप्रमाणे या ठिकाणी २०१०-११ तेरा टक्के दराने वाढ करण्यात आलेली थांबवावी व माफ करावी. ठराव क्र. ६८ प्रमाणे कार्यवाही करावी असा मी आदेश देत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर, मा. उपमहापौर, आम्ही याच विषयाला एक मिनिट घेतो. विषय असा आहे....

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

या विषयावर मघाशी विरोध करत होते.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही विषयाला विरोध करत नव्हतो.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

तुम्ही पुढचा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, एक मिनिट थांबा. चर्चा त्यांनीच करायची आम्ही करायची नाही का?

(सभागृहात गोंधळ )

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत. (दि. ०२/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. १२३)

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. गटनेते श्री. भगवती शर्मा आणि सन्मा. सभागृह नेत्या श्री. प्रभातताई पाटील यांनी आत्ता जो लाभकर एकूण १३ टक्के रद्द करण्यासंदर्भातील जो ठराव होता, त्याच्यावर अद्यापही कार्यावही झालेली नाही. मा. महापौर साहेब, आपण आत्ता आदेश दिलेला आहे की, जी १३ टक्के करवाढ झालेली आहे, ती रद्द करण्याचा. मला सन्मा. आयुक्त साहेबांकडून या ठिकाणी खुलासा पाहिजे की, मा. महापौर साहेबांनी आत्ता रूलिंग दिलेले आहे. त्याची अंमलबजावणी आपण करणार आहात का? आणि तातडीने करणार आहात का? याचा खुलासा करावा. मा. महापौर साहेबांनी रूलिंग दिले आहे. मा. महापौर साहेब बऱ्याच रूलिंग देत असतात. त्याची अंमलबजावणी होत नाही. संपूर्ण नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन सन्मा. गटनेते आणि सन्मा. सभागृह नेत्या श्री. प्रभातताई पाटील, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने ही करवाढ रद्द करावी यासाठी प्रस्ताव मांडला. मा. महापौर साहेबांनी तो रद्द करण्याचा आदेश दिला. मा. आयुक्तांनी आत्ता खुलासा करावा की, तो कधी रद्द करणार आहेत? तातीडने रद्द करणार की, आपण त्या आदेशाला पुन्हा केराची टोपली दाखवणार? सन्मा. महापौर वेळोवेळी आदेश देतात, निर्देश देतात, रूलिंग देतात. त्याची अंमलबजावणी होत नाही. या ठरावाची अंमलबजावणी होणार की नाही याचा आपण कृपया खुलासा करावा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आम्हालासुध्दा तेच म्हणायचे होते.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही आत्ता म्हणता की, पुढे चालू करा. सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांनी जे विचारले त्याचा खुलासा होऊ द्या. आपण ठराव केला. पहिला केला होता त्याची अंमलबजावणी झाली नाही......

**धुव्रकिशोर पाटील :-**

साहेब, ज्या नागरिकांनी पैसे भरले आहेत त्यांचे काय होणार? ते पैसे रिफंड मिळतील का? साहेब, याचापण खुलासा करा.

**लक्ष्मण जंगम :-**

आत्ता नेमके काय होणार आहे त्याचे निवेदन मा. आयुक्त साहेबांना करू द्या. नाहीतर आपल्याला परत पुढच्या मा. महासभेमध्ये आणखीन एक ठराव करावा लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, त्याच विषयावर बोलतो.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसा.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आम्ही नेहमी बसा. त्यांनी चर्चा केली आणि आम्ही बसायचे का? त्याच विषयावर बोलतो आणि कायद्यातले बोलतो. विषय ऐकून घ्या.

**मा. महापौर :-**

या विषयावर आपण शहरामध्ये भीक मागितली. लोकांनी भीकपण दिली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तो विषय तुमचा नाही आमचा आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, इनका विषय कर के अंदर कमी करने का था। उस विषय के अंदर इन्होने शहर मे बडा दुष्प्रचार किया कि, टॅक्स कम होना चाहिए। हमारा आज सभा के अंदर यहापर जो विषय हुआ है, वह जो हमने लेस किया हुआ टॅक्स है। उसके उपर हमने चर्चा की है।

(सभागृहात गोंधळ )

**भगवती शर्मा :-**

हमारे ठराव मे आपका विरोध है क्या? विरोध है तो बोलिए। नही तो मंजूर किजीए। खत्म हो गया।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इम्प्लीमेंट करने को बोल रहे है।

**नरेंद्र मेहता :-**

मा. उपमहापौर जी आम्ही आमची भुमिकी एक-दोन मिनिटात मांडतो. श्री. भगवती शर्मा जे बोलतात त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. विषय असा आहे.....

**मा. महापौर :-**

तो रिपीट करण्याची गरज नाही.

(सभागृहात गोंधळ )

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर आणि मा. उपमहापौर, विषय असा आहे की, आपण जी करवाढ केलेली आहे, ज्याच्यामध्ये श्री. भगवती शर्मा यांनी जे दोन टॅक्स वगळलेले आहेत. आम्ही सहमत आहोत ते वगळायला पाहिजे. महत्वाचा विषय काय ते आपण समजून घ्या. की, श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या वडिलांच्या नावाने श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी चार दिवसा अगोदर पत्र दिले होते की, महापालिकेने जी काही करवाढ केलेली आहे, ती कुठल्या नियमाखाली केलेली आहे? आणि ती तुम्हाला करता येते का? त्याच्यामध्ये श्री. विजय पाटील यांनी .....

(सभागृहात गोंधळ )

**प्रभात पाटील :-**

तुमच्याकडे त्यांनी येऊन ते विचारावे. आत्ता मा. महापौरांनी जो आदेश दिला आहे त्याच्यावर तुमचे उत्तर काय ते सांगा. विषय पुढे घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. माजी महापौर साहेब, एक लक्षात घ्या. या शहरातील एक प्रतिष्ठीत व्यक्तीने पत्र दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

एकाच लाईनचे उत्तर आहे.

(सभागृहात गोधळ)

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौरजी विषय समजून घ्या. मी त्या विषयाला बोलतो आहे. विषय एवढा आहे की, मा. आयुक्त साहेबांनी उत्तर दिले आहे की, आम्ही हे गर्व्हमेन्टला मान्यतेसाठी पाठवलेले आहे. याचे मिनींग हे होते की, अजून मान्यता बाकी आहे. दुसरे त्यांनी विचारले की, हे जे एक्स्ट्रा पैसे भरले. उद्या गर्व्हमेंटने विरोधात निकाल दिला किंवा मा. हायकोर्टामध्ये जनहित याचिका दाखल झाली. पैसे परत देणार का? ते बोलतात की, भरलेले पैसे महापालिका परत देणार नाही. म्हणजे नागरीकांनी काय करायचे? पैसे भरायचे की नाही? आणि एका बाजुस तुम्ही रायटींगमध्ये सांगता की, ही जी करवाढ झालेली आहे, त्याला कायद्यामध्ये गव्हर्नमेंटला मान्यतेला पाठवली आहे. याचे मिनींग काय? मा. हायकोर्टामध्ये ॲफीडेव्हीट केलेले आहे की, सदर जी

करवाढ केलेली आहे ती तारीख निघाली होती म्हणून आम्ही गव्हर्नमेंटला मान्यतेसाठी आणि मंजुरीला पाठवलेले आहे. अजूनपर्यंत मंजूरी मिळालेली नाही असे मा. हायकोर्टामध्ये ॲफीडेव्हीट आहे आणि इकडे आपण करवसुली करतो आहे.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

मैने जो ठराव किया उसके अंदर यह प्रश्न नही है।

**प्रभात पाटील :-**

फक्त त्या ठरावाची अंमलबजावणी बोला. फक्त त्या ठरावा विषयी बोला.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये प्रश्न आणि उत्तर यामध्ये गफलत होते आहे. महितीच्या अधिकाराखाली श्री. विजय पाटील यांना माहिती अधिकारी म्हणून नेमलेले आहे. त्यावर अपिलन्ट ऑथोरिटी उपायुक्त आहेत. माहितीच्या अधिकाराखाली माहिती विचारली म्हणजे मा. आयुक्तांनी उत्तर हे दिले असा त्याचा अर्थ होत नाही ते ज्यावेळेला माझ्याकडे चर्चेसाठी आले त्यावेळेला मी सांगितले ते माझ्यावर बाईंडेड नाही. कारण माहितीच्या अधिकाराखाली माहिती विचारली.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पत्राचे उत्तर दिलेले आहे. माहितीचा अधिकार नाही.

**मा. आयुक्त :-**

आणि जे ठराव ८ टक्के  जो दोन विषयासंबंधी, रस्त्याचा ८ टक्के आणि पाणी पुरवठा लाभकर ८ टक्के हा ठराव मा. महासभेत झालेला होता. त्याप्रमाणे सचिवांशी चर्चा झाली. त्यावेळेला मा. महापौर साहेब आणि मा. स्थायी समिती चेअरमन उपस्थित होते. ज्या ज्या महापालिका याची पुर्तता करणार नाही त्या त्या महापालिकेला कोणताही प्रस्ताव किंवा प्रकल्प किंवा अनुदान देण्यात येणार नाही असे सांगितले होते. त्यामुळे आपण रस्ता अनुदान कट केला कारण यापूर्वी जो ठराव झाला होता तो महापालिकेच्या डी.सी. रुलमध्ये बदल करुन रोड करायचे म्हणून आपण तो रोडला ८ टक्के लाभकर कट केला. आत्ता पाणी पुरवठ्याचे कट करा असे सभागृहात व्यक्त होत आहे. याबाबत मा. महापौरांना घेऊन जाऊन मा. सचिवांशी चर्चा करुन निर्णय घेऊन पुढच्या सभेमध्ये सांगतो आणि समजा कट करुन काय करणार असा प्रश्न काहींना पडला आहे. तर मा. सचिवांनी कट करा म्हणून सांगितले, तर मा. सचिवांच्या म्हणण्याप्रमाणे पाणीपट्टीचे जे पुढचे बिल जाईल त्यामध्ये ८ टक्के ची रक्कम कमी पाठवू.

**प्रकरण क्र. ६३ :-**

दि. ११/०२/२०१० व २४/०२/२०१० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६४ :-**

दि. ११/०२/२०१० व २४/०२/२०१० रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत. (दि. ०२/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. १२३)

**प्रभात पाटील :-**

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीच्या बाबतीत पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल आणि परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण संस्था यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली या सारख्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत असेल अशा इमारतीच्या बाबतीत मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करुन पुढील प्रमाणे कलम समाविष्ट केलेले आहे.

**कलम १४०ब.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी परिस्थिकीयदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाव्दारे, निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सुट किंवा परतावा देईल आणि परिस्थितीकीयदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता आणि ती चालू ठेवण्याकरीता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेउन, सुट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारीत करता येतील.

उपरोक्त तरतुद करुन सदरचा अधिनियम १४ जानेवारी २००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या व अस्तित्वात असलेल्या गृह संकुलनामध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग), सौर उर्जेचा वापर (सोलर वॉटर हिटर), सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि वापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) आदी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

वरीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी ही पर्यावरणानुकुल असल्याने पर्यावरणाचे तसेच मूलभुत सुविधा स्त्रोतांचे रक्षण होण्यास मदत होत आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीसाठी मोठया प्रमाणात भांडवली खर्च तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी गृहनिर्माण संस्थांना खर्च करावा लागत असतो. पर्यावरणनुकुल व परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माणास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी होणारा खर्च पाहता अशा गृहनिर्माण वा सोसायटयांना मालमत्ता करात सुट किंवा परतावा देणे संयुक्तीक आहे..

तसेच अशा वेगवगळया योजनांसाठी वेगवेगळया दराने सुट किंवा परतावा देण्याची तरतुद उक्त कलमामध्ये करण्यांत आलेली आहे. त्या प्रमाणे खालील सुट देण्यांसाठी दर निश्चित करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | योजना | मालमत्ता करात सुट देण्याचा प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) | ५% |
| २ | सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत (सोलर वॉटर हिटर) | ५% |
| ३ | सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) | ५% |
| ४ | गृहनिर्माण सोसायटी व ले आउटमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे | ५% |

ज्या गृहनिर्माण संस्थांना सदर योजना राबविणेकामी आर्थिक अडचण असेल अशा गृहनिर्माण संस्थांना नगरसेवक आपल्या नगरसेवक निधीतुन मदत करु शकतील. तसेच नागरीकांच्या आरोग्याचा विचार करता ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या मशिन खरेदी करणेकामी नगरसेवक आपल्या नगरसेवक निधीचा विनीयोग/खरेदी करु शकतील.

तसेच मालमत्ता करात सुट देण्यासाठी खालील निकषही ठरविणे आवश्यक आहे.

१) मालमत्ता करात सुट मिळविणेसाठी प्रतिवर्षी १ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान संबधित गृहनिर्माण सोसायटीने महानगरपालिकेकडे अर्ज करावा लागेल.

२) अर्जासोबत उक्त योजनांची अंमलबजावणी करुन त्या चालू असल्याबाबत महानगरपालिकेच्या संबधित विभागाचे (पाणी पुरवठा/ सार्व. बांधकाम/ आरोग्य) प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) सदर सूट ही सामान्य करावर दिली जाईल.

तरी वरील निकषावर उक्त लाभदायक योजनांची अमंलबजावणी करणाऱ्या मालमत्तांना करामध्ये सन २०१०-११ या वर्षापासून सुट देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये माझी एक सुचना आहे. आपण जे लिहिलेले आहे, सौर उर्जा रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टिम, पाण्याचे पुनःश्चक्र, त्याच्यात आपण इंधन वेल पण लिहा. कारण कुठे कुठे अशा सोसायटीं आहेत की, तिकडे जागा नाही. ग्रामपंचायत काळापासून बनलेल्या बिल्डींग आहेत. तिथे कमी जागा आहे. तिथे कुठे रेन हार्वेस्टींग करण्यासाठी जागा नसेल किंवा सौर उर्जा करण्यासाठी टेरेसवर असतील. पण इमारती आत्ता पुर्नबांधणीसाठी आलेल्या आहेत तर अशा काही जागा कमी असेल तिकडै त्यांना जर आपण बोअरवेल मारुन दिली. जसे नगरसेवक निधीतुन खर्च करु शकतो असे यांनी बोलले. ठरावामध्ये होते. तसेच आपण इंधन वेल लावण्यासाठी पण त्यांना करा. म्हणजे आपले पाणी बचत होऊ शकते. ते पणी त्यांना

सांडपाण्यासाठी वापरु शकतात. तर माझी सुचना आहे की आपण कृपया याच्यात एक सुचना घ्यावी की, इंधनवेलसाठी नगरसेवक निधी वापरण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

श्री. शशिकांत भोईर यांच्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद मेहता :-**

आत्ता ताईंनी जो विषय मांडला चांगला विषय आहे प्रशासनाकडून आणलेला आहे. माझी फक्त एवढी सुचना आहे की, आत्ता ओ.सी. देताना आपण सोलर सिस्टम कंम्पलसरी केले आहे. रेन वॉटर हार्वेस्टींगपण कंम्पलसरी केलेले आहे. पण ९० टक्के आपले जे लागतात, पण दुसऱ्या वर्षी चालत नाही याचा मुळ उद्देश आहे की, आपण कुठेतरी वीजेची बचत करुया आणि पाण्याचीसुध्दा आपण बचत करु या. पण हे प्रोजेक्ट राबवले जातात पण त्याला कोणी मेन्टेन करत नाही आणि नंतर पुढच्या वर्षी ती सुट कायम राहते. पण खरे म्हणजे ज्या वापरासाठी आपण ती सुट देतो ती जात नाही. तर कुठल्यातरी सक्षम अधिकारी, दरवर्षी त्यांनी ते प्रमाणपत्र घ्यायचे बंधनकारक केले तर ते मेन्टेन करतील. नाहीतर कोणी मेन्टेन.......

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ते आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

मला क्लिअर नव्हते म्हणून मी विचारले. दुसरी गोष्ट अशी आहे की, श्री. शशिकांत भोईर यांनी जो प्रश्न मांडला . आपल्या मिरा भाईंदरमध्ये जो वॉटर लेव्हल आहे तो खुप वर आहे. सगळे नाले आपण दोन फुट खोदले तर डायरेक्ट गटाराचे पाणी बाहेर येते. म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टींग पेक्षा बोअरवेल वगैरे आहेत, त्याच्यामध्ये आपण जर खाली एकदम डीप गेले, रॉक लागले तर आपल्याला गोड पाणी मिळते. रेन हार्वेस्टींगमध्ये आपण तेवढे डीप जात नाही. तर श्री. शशिकांत भोईर यांनी जो प्रश्न मांडला की, एखादा कोणी , कारण बोअरवेलला पण लाखो रुपयांचा खर्च आहे. तर त्या बोअरवेलमध्येपण सुट देता येईल. दुसरे काही ठिकाणी, पर्टीक्युलर भाईंदर पूर्व या भागात जर आपण बघितले तर बऱ्याचशा इंडस्ट्रीमध्ये आपण बघितले असेल की, खारे पाण्याचे छोटी बावडीसारखे खोदलेले आपण बघतो. त्याचा ते पूर्णपणे वापर करतात. या प्रकारचे भाईंदर पूर्वेमध्ये होऊ शकते तर त्यांना ५ टक्के नाही तर त्यांना २ टक्के किंवा ३ टक्के याप्रकारचे खरोखर पाणी वाचवायचे असेल तर हिसुध्दा सुचना त्यात समाविष्ट केली तर त्याच्यावर कुठेतरी खरोखर होणार नाही तर ते होणार नाही. कारण रेन हार्वेस्टींग कोणी करणार नाही. दोन फुटापर्यंत गटाराचे पाणी येते. केले तरी त्याचे काय होणार नाही. म्हणजे आपण एखादे चांगले करायचे आणि ते प्रॅक्टीकली होतच नाही. म्हणजे करायचे आहे तर लॉंग टर्म पूर्ण विचार करावा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

रेन वॉटर हार्वेस्टींग आपल्या शहरामध्ये सगळ्या ठिकाणी प्रॅक्टीकली होणार नाही. तुम्हाला उदाहरण देईन की, जेसलपार्क किंवा मिरारोडचा काही भाग आहे, तिकडे चिखल आहे. खारी माती आहे. त्याच्यामुळे त्या जमिनीत पाणी जिरणं आणि पाण्याची पातळी वाढणे ईट्स कॉल रेन वॉटर होव्र्स्टींग तर ते आपल्याकडे शक्य नाही. काही ठिकाणी म्हणजे उत्तनचा काही भाग आहे, काशिमिरा परिसर आहे. काही ठिकाणी शक्य आहे. जसे आपण सोलर वॉटर हिटर लावलेले आहेत. आपल्याकडे पाण्याचाच प्रॉब्लम मोठा आहे. माझे मा. आयुक्तांशी या विषयावर बोलणे झाले. जर पाण्याचा प्रॉब्लम असेल तर तिकडे सोलर वॉटर होऊच शकत नाही. त्याला त्याच्यामध्ये चोवीस तास पाणी लागते. तेव्हा मा. आयुक्तांनी या विषयावर थोडेसे सांगावे.

**नरेंद्र मेहता :-**

श्री. पाटील साहेब, आपण आत्ता मुद्दा मांडला की, काही ठिकाणी होऊ शकत नाही. पण आपण बिल्डींग परवानगीमध्ये अटीशर्ती टाकतो आणि त्या अटीशर्तीप्रमाणे......

**लक्ष्मण जंगम :-**

सोलरचा पाण्याशी काय संबंध येतो.

**नरेंद्र मेहता :-**

मी तेच बोलतो की, सुट द्यायची. तिकडे प्रोजेक्ट राबवलाच जात नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, याच्यावर माझी अशी एक सुचना होती. हा महत्वाचा विषय असून त्याला गोषवारा देण्यात आलेला नाही. स्टॅन्डीगचे ठराव वगैरे दिले आहेत. पण यापुढे महत्वाच्या विषयावर गोषवारे द्यावे. या विषयामध्ये आपण जे आत्ता बिल्डर्सना किंवा सोसायट्यांना बंधन घालतो. बिल्डर फक्त आपल्या इकडे अग्नीशमन व्यवस्था टॉवरमध्येच करतो. मी पाण्याच्या संदर्भातील सांगतो. आपण ज्या-ज्या एनओसी देतो, त्यामध्ये बऱ्याचशा ठिकाणी सर्व खर्च आपल्यावर टाकला जातो. याचबरोबर आपण जी पाण्याची पाईपलाईन टाकतो त्याच्यामध्ये फायर हायड्रेन हा प्रकार असतो. मोठी-मोठी संकुले आली. पाणी येईल, नाही येईल तो भाग निराळा आहे. पण सर्व भाईंदर शहरात फिरले असता एकाही बिल्डरने स्वतःची फायर हायड्रेनची व्यवस्था आपल्या कॅम्पसमध्ये केलेली दिसून येत नाही. तुमचा अग्नीशमन कायदा जो निघालेला आहे. त्यामध्ये ती तरतुद आहे, परंतु एकही मोठे संकुल ज्याच्यात पन्नास बिल्डींग आहेत, शंभर बिल्डींग आहेत, पंचवीस बिल्डींग

आहेत, त्यांनी त्या-त्या ठिकाणी फायर डायड्रेनची व्यवस्था करावी अशी एक अट आपण टाका. कारण उंचमाळ्याच्या बिल्डींग सुरू झाल्या आहेत.

**मा. महापौर :-**

सुचनेसह ठराव कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत. (दि. ०२/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. १२३)

**ठराव क्र. ६५ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीच्या बाबतीत पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल आणि परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण संस्था यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली या सारख्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत असेल अशा इमारतीच्या बाबतीत मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करुन पुढील प्रमाणे कलम समाविष्ट केलेले आहे.

**कलम १४०ब.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी परिस्थिकीयदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाव्दारे, निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सुट किंवा परतावा देईल आणि परिस्थितीकीयदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता आणि ती चालू ठेवण्याकरीता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेउन, सुट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारीत करता येतील.

उपरोक्त तरतुद करुन सदरचा अधिनियम १४ जानेवारी २००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने निर्माण होणा-या व अस्तित्वात असलेल्या गृह संकुलनामध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग), सौर उर्जेचा वापर (सोलर वॉटर हिटर), सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि वापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) आदी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

वरीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी ही पर्यावरणानुकुल असल्याने पर्यावरणाचे तसेच मूलभुत सुविधा स्त्रोतांचे रक्षण होण्यास मदत होत आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीसाठी मोठया प्रमाणात भांडवली खर्च तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी गृहनिर्माण संस्थांना खर्च करावा लागत असतो. पर्यावरणनुकुल व परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माणास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी होणारा खर्च पाहता अशा गृहनिर्माण वा सोसायटयांना मालमत्ता करात सुट किंवा परतावा देणे संयुक्तीक आहे..

तसेच अशा वेगवगळया योजनांसाठी वेगवेगळया दराने सुट किंवा परतावा देण्याची तरतुद उक्त कलमामध्ये करण्यांत आलेली आहे. त्या प्रमाणे खालील सुट देण्यांसाठी दर निश्चित करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | योजना | मालमत्ता करात सुट देण्याचा प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) | ५% |
| २ | सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत (सोलर वॉटर हिटर) | ५% |
| ३ | सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) | ५% |
| ४ | गृहनिर्माण सोसायटी व ले आउटमध्ये ओल्या कच-यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे | ५% |

ज्या गृहनिर्माण संस्थांना सदर योजना राबविणेकामी आर्थिक अडचण असेल अशा गृहनिर्माण संस्थांना नगरसेवक आपल्या नगरसेवक निधीतुन मदत करु शकतील. तसेच नागरीकांच्या आरोग्याचा विचार करता ओल्या कच-यावर प्रक्रिया करणा-या मशिन खरेदी करणेकामी नगरसेवक आपल्या नगरसेवक निधीचा विनीयोग/खरेदी करु शकतील.

तसेच मालमत्ता करात सुट देण्यासाठी खालील निकषही ठरविणे आवश्यक आहे.

१) मालमत्ता करात सुट मिळविणेसाठी प्रतिवर्षी १ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान संबैधत गृहनिर्माण सोसायटीने महानगरपालिकेकडे अर्ज करावा लागेल.

२) अर्जासोबत उक्त योजनांची अंमलबजावणी करुन त्या चालू असल्याबाबत महानगरपालिकेच्या संबधित विभागाचे (पाणी पुरवठा/ सार्व. बांधकाम/ आरोग्य) प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) सदर सूट ही सामान्य करावर दिली जाईल.

तरी वरील निकषावर उक्त लाभदायक योजनांची अमंलबजावणी करणाऱ्या मालमत्तांना करामध्ये सन २०१०-११ या वर्षापासून सुट देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक श्री. अनिल सावंत यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंर महानगरपालिका क्षेत्रातील बऱ्याच इमारतींना पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टींग) करण्यासाठी जाग उपलब्ध नाही अशा इमारतींच्या जागेमध्ये बोरवेल मारण्यासाठी नगरसेवक निधी वापरण्यात यावा अशी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाची कंपनी म्हणून स्थापना. (दि. ३०/०९/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ७८)

**कल्पना म्हात्रे :-**

श्री. सपार यांच्या अंतयात्रेसाठी जाण्याकरीता काही नगरसेवक इच्छुक आहेत. म्हणून आजची सभा तहकुब व्हावी असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये सौर उर्जेचा वापर सर्वात जास्त हॉस्पीटल आणि लॉजींग-बोर्डिंग यांवर करण्यासाठी सौर उर्जेचे कम्पलशन धोरण ते होते. नंतर आपण जसजसे पाणी येईल तस तसे यांनापण लागू करू. परंतु महत्वाची लागू आहे हॉस्पीटल आणि लॉजींग-बोर्डिंग आहे. मला वाटते की, रेन वॉटर हार्वेस्टींग, सैार उर्जा आणि इतर ज्या सूट देण्याच्या ॲक्टीव्हीटीज आहेत, त्यासाठी नगररचना अधिकारी प्रमुख करावा. आणि काही सदस्यांची समिती स्थापन करून ज्यांनी ज्यांनी केलेले नाही, केलेले आहे ते तपासून सूट देण्याची प्रक्रिया करावी अशी विनंती आहे. कारण काही सदस्यांची कमिटी आणि नगररचनाचे अधिकारी यांना प्रमुख करून जे-जे अंमलबजावणी केलेले आहेत त्यांनाच सूट द्यावी. म्हणजे जेणेकरून असे होणार नाही की, केले नसतानापण सूट दिली. असे होऊ नये यासाठी एका कमिटीची स्थापना केली तर बरे होईल.

**मिलन म्हात्रे :-**

त्यामध्ये शाळासुध्दा इन्क्लुड करा. शाळांमध्ये हजारो विद्यार्थी असतात. त्याच्यात शाळासुध्दा इन्क्लुड करा. पाण्याचा वापर जास्त प्रमाणात असे आपण बोललात. मग शाळेमध्ये दहा हजाराच्या वर....

**मा. आयुक्त :-**

कुठल्या शाळा?

**मिलन म्हात्रे :-**

या खाजगी शाळा, आपल्या शाळा.

**मा. आयुक्त :-**

सौर उर्जेचा वापर तिथे काय होणार? शाळेमध्ये काही होणार नाही.

**जुबेर इमानदार :-**

साहेब, त्यांचे म्हणणे बरोबर आहे. सौर उर्जा फक्त पाणी तापवण्याकरिता उपयोगी येत नाही......

**मा. आयुक्त :-**

सौर ऊर्जा लाईटींगसुध्दा करता येते.

**मिलन म्हात्रे :-**

सौर ऊर्जा म्हणजे फक्त गरम पाणी नाही. आणि आपल्या महापालिकेमध्ये काय हालत आहे. आपल्या इकडचे रेन वॉटर हार्वेस्टींग चालू आहे का? जरा अधिका-यांनी उत्तर द्यावे.

**मा. आयुक्त :-**

रेन वॉटर हार्वेस्टींग चालू आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

एक तहकुबीची सुचना इकडे आलेली आहे. आपण ज्या विषयावर मगाशी बोललो की, सन्मा. नगरसेविका श्रीम, उमा सपार यांचे पती वारले आहेत. तर श्रीम. कल्पना म्हात्रे यांची सुचना आहे. त्यांना मी विनंती करतो की, दुपारी दोन वाजेपर्यंत जेवढे विषय आपल्याला संपवता येतील तेवढे आपण संपवू या. कारण विषयही महत्वाचे आहेत आणि तिकडे जाणेही तेवढेच महत्वाचे आहे. तर दोन वाजेपर्यंत आपण जास्तीत जास्त विषय संपवण्याचा प्रयत्न करू.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही त्याला सहमत आहोत. पण आम्हाला व्यवस्थित पाच-दहा मिनिटे दिली तर आपण व्यवस्थित चर्चा करू. आपण बोलणार की, चर्चा नाही. जायचे आहे. तसे करू नये.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही चार-पाच जण एकदम उठता. त्याच्यामुळे कोणाचेही कोणी ऐकू शकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

जो ऊर्जेचा विषय होता. तो विषय पाच मिनिटात संपला. तुम्ही आम्हाला बोलू द्या. बोलूच देत नाहीत.

**मदन उदितनारयण सिंह :-**

मा. महापौर साहब जैसे टॅक्स छूट मे टॅक्स को छूट दिया। उसी तरह अपने मा. स्थायी समितीने भूतपूर्व सैनिको को टॅक्स मे छूट दिया है। लेकिन उनका अभी तर कोई इम्प्लीमेंटेशन नही हो रहा है। और उनको अधिकारियों व्दारा बहोत परेशान किया जा रहा है। अब तक हमारा कोई तो नही बना की, इनके क्या-क्या पेपर चाहिए। और भूतपूर्व सैनिकोंको बहोत तकलिफ है। उसपर निर्णय लेकर जल्दी छूट...

**मा. महापौर :-**

आपका विषय बराबर है। लेकिन वह लोक कागज लाकर देना चाहिए।

**मदन उदितनारयण सिंह :-**

कौनसा कागज चाहिए, अब तक उनको बराबर बताया नही जा रहा है।

**मा. आयुक्त :-**

जो सेवानिवृत्त हुए है, उन्होंने कागजपत्र देना जरूरी है। ॲफीडेव्हीट करना जरूरी है। फॅमिली मे कोन-कौनसे लोग रहेते है, उनका लिस्ट देना जरूरी है। रेशनकार्ड देना जरूरी है। यह सब कागजपत्र हर एक के पास से मंगाए है। जिन्होने कागजपत्र दिए है, उनको छूट मिलेगी।

**मदन उदितनारयण सिंह :-**

कई लोग दे चुके है। उनका छूट कब तक होगा?

**जुबेर इनामदार ;-**

साहेब, त्यांना एक सर्क्युलर काढा.

**मदन उदितनारयण सिंह :-**

कई लोगों का आ चुका है, उनको जल्दीसे छूट दिया जाए।

**मा. आयुक्त :-**

ज्यांची कागदपत्र पूर्तता होईल त्यांचे आम्ही करणार.

**मदन उदितनारयण सिंह :-**

श्री. पाटील साहेब, क्या-क्या कागज चाहिए उसका एक लिस्ट आप अपने ऑफीस के बाहर चिपकाकर रखिए।

**विजय पाटील :-**

साठ लोकांनी कागदपत्र दिलेले आहेत. त्याच्यामधील जवळ-जवळ दहा लोकांनी त्यांचे फोटो सबमीट केलेले नाहीत. बाकीच्या पन्नास लोकांचे काम आपण करून देत आहोत.

**मदन उदितनारयण सिंह :-**

तुमच्या ऑफीसच्या बाहेर एक सुचना, नोटीस पत्रक लावा की, तुम्हाला काय-काय कागद पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

जे लोक आहेत त्या लोकांना काय-काय पाहिजे ते इंडिव्हीज्युअल पत्र पाठवलेले आहे.

**मदन उदितनारयण सिंह :-**

ज्यांची पूर्तता झालेली आहे, त्यांचे लवकरात लवकर करण्यात यावे.

**जुबेर इनामदार :-**

लागणारी वस्तू वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावी. म्हणजे लोकांना ऑटोमॅटीक समजेल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, माजी सैनिकांनी पेपर दिल्यानंतर एक महिन्यानंतर त्यांना पत्र पाठवलेले आहे की, तुम्ही ब्लॅंक पन्नास, रूपयांचा स्टॅम्प पेपर फक्त आणून द्या. बाकी काही करायची गरज नाही. मग त्या स्टॅम्प पेपरवर सर्व लिहून अधिकारी सही करणार की, कोण सही करणार? ते पत्र मी बघितलेले आहे.

**मदन उदितनारयण सिंह :-**

मा. महापौर साहब, वो स्टॅम्प पेपर देने के बाद अब बोल रहे है की, ॲफीडेव्हीट करो। तो उनको कितनी बार दौडाया जाएगा।

**विजय पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. करार आमच्या मॉडेलप्रमाणे करणार आणि त्यांना आम्ही सहीसाठी बोलावणार.

**मदन उदितनारयण सिंह :-**

त्याला ॲफीडेव्हीट करायची गरज नाही ना?

**विजय पाटील :-**

करारावर सही करण्यासाठी तरी आपल्या ऑफीसला यावे लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

त्या मॉडेलची प्रक्रिया, त्यांना ड्राफ्टच द्या. तुम्हाला कशाला पाहिजे? ड्राफ्टची कॉपी देता येते ना?

**विजय पाटील :-**

त्यांच्या संस्थेकडे. ड्राफ्टची कॉपी पाठवण्याची व्यवस्था करतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. महासभा दि. २०/०२/२००४, ठराव क्र. ५७ अन्वये प्रस्तावित कंपनीत मत्ता मालकीनुसार भाग भांडवलाची रचना असावी अशा आशयाचा ठराव करण्यात आला आहे. आता मा. स्थायी समिती दि. ३०/०९/२०१० ठराव क्र. ७० अन्वये पाण्याच्या मंजूर कोट्यानुसार भाग भांडवल ठरविण्यात यावे अशी महासभेस शिफारस केली आहे.

मत्ता मालकीनुसार तसेच पाण्याच्या मंजूर कोट्यानुसार विविध संस्थांचे भाग भांडवल खालीलप्रमाणे राहणार आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मत्ता मालकीनुसार प्रतिशत टक्केवारी | मंजूर कोट्याप्रमाणे प्रतिशत टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिका, ठाणे | ४९.७८ | ४१.७८ |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका | ३२.५५ | २९.४५ |
| ३ | भिवंडी महानगरपालिका | १४.६८ | २५.०० |
| ४ | जिल्हा परिषद | २.९९ | ३.७७ |
| **एकुण** | | **१००.००** | **१००.००** |

मत्ता मालकीनुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे भाग भांडवल हे कोटा पद्धतीने काढलेल्या भाग भांडवलापेक्षा जास्त आहे. मात्र भविष्यात मिरा-भाईंदर, भिवंडी महानगरपालिकेची पाण्याची गरज विचारात घेता, स्टेम प्राधिकरणाकडून या महापालिकांना जादाचा पाणी पुरवठा होणे अपेक्षित आहे. ठाणे महानगरपालिकेने स्वतःच्या पाणी पुरवठा योजनांची उभारणी केली असल्याने भविष्यात त्यांच्या कोट्यात वाढ होण्याची शक्यता नाही. म्हणजेचे कोट्यानुसार भाग भांडवल ठेवल्यास भविष्यात मिरा-भाईंदर तसेच भिवंडी निजामपुर महानगरपालिकेच्या दृष्टीने फायद्याचे राहणार आहे.

सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेचे भाग भांडवल ४९.७८% आहे. जे मत्ता मालकी वाढल्याने भविष्यात ५१% किंवा त्यापेक्षा जादा होउ शकते. याउलट मिरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका मिळुन मंजूर कोट्यानुसार एकत्रित भाग भांडवल ५४.४५% सद्यस्थितीत राहणार आहे व भविष्यात मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून जादा कोटा मंजूर झाल्यावर वरील टक्केवारीत वाढच होत राहणार आहे. अशा परिस्थितीत मिरा-भाईंदर तसेच भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांचे एकत्रितरित्या प्रस्तावित कंपनीच्या कारभारामध्ये नियंत्रण राहील व ते मिरा भाईंदर महापालिकेच्या हिताचे राहील.

मा. महासभेच्या पुर्वी मंजूर ठरावात शिखर समितीचे अध्यक्ष रोटेशन पद्धतीने व दोन वर्षांच्या कालावधीसाठी राहतील असे सुचित केले होते. परंतु दि.२७ फेब्रुवारी २००९ रोजी निर्गमित शासन निर्णयान्वये महापौर, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनाच प्रस्तावित कंपनीचे अध्यक्ष ठरविण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही बाबींचा विचार करता दि.२७ फेब्रुवारी २००९ चा शासन निर्णय तात्काळ रद्द होण्यास व मा. स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे पाण्याच्या मंजूर कोट्यानुसार भाग भांडवलाची रचना ठरविण्यास, त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना ही महासभा प्राधिकृत करीत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

चांगला विषय आहे. मा. आयुक्तांचे कौतुक करतो. साहेब, विषय असा आहे, सभागृहाला थोडी माहिती देतो की, ज्यावेळी आपण स्टेमकडून पाणी घ्यायचो. त्यावेळी त्यानंतर त्याच्यामध्ये गव्हर्नींग कौन्सील स्थापन केली गेली. भिवंडी, मिरा भाईंदर आणि ठाणे. त्यानंतर गव्हर्नींग कौन्सीलमध्ये मा. महापौर-उपाध्यक्ष, आणि मा. आयुक्त साहेब, या दोघांचे म्हणजे शेवटी मिरा-भाईंदर आणि भिवंडी या दोघांची तिकडे सहमती होती. त्याप्रकारे तो निर्णय व्हायचा. आणि ह्या प्रकारे कामकाज चालत होते. आम्ही ठाण्याला वारंवार विनंती केली की, हे जे अध्यक्षपद आहे ते रोटेशन असले पाहिजे. कारण तिनही याच्यात पार्टनर आहोत, ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी. पण त्या लोकांनी कधीही आम्हाला दाद दिली नाही. त्यांनी त्यांना पाहिजे तसे विषय आणले. त्यांना पाहिजे तसे अधिकारी वापर केले. आपली पाईपलाईन त्यांनी सहा-सहा वर्षे चेंज केली नाही. शेवटी याच्यामध्ये आपल्यावर इंकमटॅक्सचा बोजा पडला की, गव्हर्नींग कौन्सील केली तर आपल्याला इंकमटॅक्स भरावे लागेल. मग ज्यावेळी गव्हर्नमेंटला रेफर केले, गव्हर्नमेंटने सांगितले की, तुम्ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापना करा. आता ज्यावेळी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन करण्याचा निर्णय झाला. तो विषय, ज्यावेळी मी महापौर हातो, त्यावेळी तिकडे उपाध्यक्ष पण होतो, त्यावेळी वारंवार हा विषय आणला गेला. पण ज्यावेळी आम्ही टेक्नीकल मुद्दे उपस्थित केले, मी असताना त्या लोकांनी तो विषय परत कधीच आणला नाही. कंपनी सेक्रेटरी वगैरे सर्व आले. कारण कंपनी स्थापन केल्यानंतर भिवंडी आणि मिरा भाईंदर साधारण ६० टक्के आपले शेअर त्याच्यामध्ये होतात आणि कंपनीचा बायलॉज आणि नियम असे आहेत की, ५१ टक्के वाला जे बोलेल ते फायनल होते. आजच्या तारखेला गव्हर्नींग कौन्सीलमध्ये भिवंडी आणि मिरा भाईंदर जे बोलेल ते निर्णय होतात किंवा भाईंदर आणि ठाणे बोलेल ते निर्णय होतात किंवा भिवंडी आणि ठाणे बोलेल ते निर्णय होतात. पण एखादे ५१ टक्केचे कधी ठाण्याचे झाले. त्याला मा. आयुक्त आणि मा. महापौर जावे किंवा नाही जावे, त्यांना पाहिजे तसे अधिकार त्या कंपनीच्या माध्यमातून प्राप्त होणार आहे. कारण ५१ टक्के शेअर होल्डर काही करू शकतो. उद्या त्याला वाटते की, मिरा भाईंदरचे पाणी १० एमएलडी कमी करा. त्याला त्या कंपनी ॲक्टप्रमाणे पूर्ण अधिकार राहणार. त्यानंतर गव्हर्नमेंटकडे बैठक झाली. गव्हर्नमेंटने आपल्या काही कंडीशन त्याच्यामध्ये टाकल्या की, आमच्या एमएमआरडीए चा एखादा अध्यक्ष असला पाहिजे. गव्हर्नमेंटचा असला पाहिजे. मग ज्यावेळी कंपनीचे मालक माझ्यासमोर आले, त्यावेळी मी त्यांना विचारले, प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे रजिस्ट्रार ऑफ कंपनी ॲक्टकडे त्यांचे वेगळे कायदे आहेत. त्याच्यामध्ये आपले कायदे घुसवून चालतात का? त्यांनी बोलले की, चालणार नाही. मग शेवटी त्याच्यामध्ये शेअरहोल्डर होईल, त्याचाच निर्णय फायनल होणार. मग आम्ही कशाला त्या एमएमआरडीए चे ऐकायचे? किंवा आम्ही कशाला गव्हर्नमेंटचे ऐकायचे? ज्यावेळी कंपनी झाली. आमचे ५१ टक्के टक्के शेअर झाले. त्यानंतर आम्ही त्यांचे का ऐकावे? मग त्या लोकांनी जी कंपनी फॉर्मेसन करणारी एजन्सी होती ती परत गेली. ते बोलले की, श्री. मेहता साहेब, आपण बरोबर बोलले. ५१ टक्के लाच तो अधिकार राहणार आहे. कोणी काही बोलले तरी तो निर्णय होणार नाही. मग त्यासाठी त्या लोकांनी तो विषय कधी आणलाच नाही. मी ज्यावेळी या पदावर नियुक्त झालो, त्यावेळी नंतर माहिती पडले की, हा विषय त्या लोकांनी आत्ता करून घेतले. ते मा. आयुक्तांना माहिती आहे. मा. आयुक्तांनी सांगितले की, आपण सभागृहात तो निर्णय घेऊ या. तर आपल्याला सभागृहाला एक विनंती राहिल की, त्या कंपनी ॲक्टमध्ये माझा पूर्ण अभ्यास झालेला आहे. ज्यावेळी हा विषय असेल त्यावेळी सभागृहाने मला अधिकार द्यावा की, मा. महापौर साहेबांबरोबर फक्त त्या विषयासाठी जायचे अधिकार मला द्या. म्हणजे भविष्यात मिरा भाईंदरचे नुकसान होणार नाही.

**मा. महापौर :-**

माजी महापौर साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो की, ही कंपनी फॉर्म झालेली आहे. आणि त्याच्यावर गव्हर्नमेंटचा एक माणूस कम्पलसरी येणार आहे. परवा जी मिटींग झाली त्याच्यामध्ये ठरलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

येऊ शकत नाही. कंपनी ॲक्टमध्ये ती प्रोव्हीजनच नाही.

**मा. महापौर :-**

आपण आत्ता त्या विषयाला ठराव करणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

गव्हर्नमेंट काय बोलते त्याला महत्व नाही. कंपनी ॲक्ट काय बोलते त्याला महत्व आहे.

**मा. महापौर :-**

त्या विषयाचा ठराव करून आपण परत बसणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

हा विषय व्यक्तिगत नाही. शहराच्या हितासाठी आहे. मी आपल्याला परत सांगतो......

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, कमिशनर साहेब खुलासा करतील ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ज्या-ज्या वेळेस पाण्यासंबंधी आम्हाला मा. माजी महापौर यांची गरज लागेल. तेव्हा त्यांना आपण घेऊन जाऊ.

**नरेंद्र मेहता :-**

पाण्यासंबंधी नाही. त्या कंपनी संबंधी.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्या कंपनी संबंधी आपला अनुभव खूप चांगला आहे. आपला अभ्यासही दांडगा आहे. आम्ही आपला जरूर फायदा करून घेऊ.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मी आत्ता ठराव मांडला त्याच्यामध्ये सुचना घ्या, दोन वाजता..

**मा. महापौर :-**

दोन वाजेपर्यंत मिटींग चालवा. नंतर बंद करायची.

**प्रकरण क्र. ६५ :-**

शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाची कंपनी म्हणून स्थापना. (दि. ३०/०९/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ७८)

**ठराव क्र. ६६ :-**

मा. महासभा दि. २०/०२/२००४, ठराव क्र. ५७ अन्वये प्रस्तावित कंपनीत मत्ता मालकीनुसार भाग भांडवलाची रचना असावी अशा आशयाचा ठराव करण्यात आला आहे. आता मा. स्थायी समिती दि. ३०/०९/२०१० ठराव क्र. ७० अन्वये पाण्याच्या मंजूर कोट्यानुसार भाग भांडवल ठरविण्यात यावे अशी महासभेस शिफारस केली आहे.

मत्ता मालकीनुसार तसेच पाण्याच्या मंजूर कोट्यानुसार विविध संस्थांचे भाग भांडवल खालीलप्रमाणे राहणार आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मत्ता मालकीनुसार प्रतिशत टक्केवारी | मंजूर कोट्याप्रमाणे प्रतिशत टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिका, ठाणे | ४९.७८ | ४१.७८ |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका | ३२.५५ | २९.४५ |
| ३ | भिवंडी महानगरपालिका | १४.६८ | २५.०० |
| ४ | जिल्हा परिषद | २.९९ | ३.७७ |
| **एकुण** | | **१००.००** | **१००.००** |

मत्ता मालकीनुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे भाग भांडवल हे कोटा पद्धतीने काढलेल्या भाग भांडवलापेक्षा जास्त आहे. मात्र भविष्यात मिरा-भाईंदर, भिवंडी महानगरपालिकेची पाण्याची गरज विचारात घेता, स्टेम प्राधिकरणाकडून या महापालिकांना जादाचा पाणी पुरवठा होणे अपेक्षित आहे. ठाणे महानगरपालिकेने स्वतःच्या पाणी पुरवठा योजनांची उभारणी केली असल्याने भविष्यात त्यांच्या कोट्यात वाढ होण्याची शक्यता नाही. म्हणजेचे कोट्यानुसार भाग भांडवल ठेवल्यास भविष्यात मिरा-भाईंदर तसेच भिवंडी निजामपुर महानगरपालिकेच्या दृष्टीने फायद्याचे राहणार आहे.

सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेचे भाग भांडवल ४९.७८% आहे. जे मत्ता मालकी वाढल्याने भविष्यात ५१% किंवा त्यापेक्षा जादा होउ शकते. याउलट मिरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका मिळुन मंजूर कोट्यानुसार एकत्रित भाग भांडवल ५४.४५% सद्यस्थितीत राहणार आहे व भविष्यात मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून जादा कोटा मंजूर झाल्यावर वरील टक्केवारीत वाढच होत राहणार आहे. अशा परिस्थितीत मिरा-भाईंदर तसेच भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांचे एकत्रितरित्या प्रस्तावित कंपनीच्या कारभारामध्ये नियंत्रण राहील व ते मिरा भाईंदर महापालिकेच्या हिताचे राहील.

मा. महासभेच्या पुर्वी मंजूर ठरावात शिखर समितीचे अध्यक्ष रोटेशन पद्धतीने व दोन वर्षांच्या कालावधीसाठी राहतील असे सुचित केले होते. परंतु दि.२७ फेब्रुवारी २००९ रोजी निर्गमित शासन निर्णयान्वये महापौर, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनाच प्रस्तावित कंपनीचे अध्यक्ष ठरविण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही बाबींचा विचार करता दि.२७ फेब्रुवारी २००९ चा शासन निर्णय तात्काळ रद्द होण्यास व मा. स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे पाण्याच्या मंजूर कोट्यानुसार भाग भांडवलाची रचना ठरविण्यास, त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना ही महासभा प्राधिकृत करीत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६६, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल - १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २००९-१० या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. ७५००/- |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १००००/- |
| ३) | कास्ट्राईब कर्मचारी महासंघ | रु. ८०००/- |
| ४) | श्रमजीवी वाराई माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना (रजि.) | रु. ८०००/- |

सन २०१०-११ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" 'फ' (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे. महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००८-०९ | सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेले अनुदान (२००८-०९) | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १३९५ | रु. ५८३०/- | ८१,३२,८५०/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०० | रु. ५८३०/- | ११,५७,७३८/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना, | २ + २ + १ = ५ | रु. ३६३०/- | १८,१५०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ७० | रु. ३६३०/- | २,४४,४४६/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ९ | रु. ११००/- | ९,२५८/- |
| | | | **एकुण** | **९५,६२,४४२/-** |

परंतु यावर्षी दि. ३१/०८/२०१० रोजी पासुन राज्यात राज्य निवडणुक आयोगाने विधान सभेची आंचार संहिता लागु केलेली आहे. राज्यात आचारसंहिता लागु असल्यामुळे महानगरपालिकेची आमसभा सुध्दा घेता येत नाही. परंतु आचांर संहिता कालावधीत दिवाळी आल्यामुळे दि. २७/११/२००२ च्या शासनाचे पत्रान्वये व कर्मचारी संघटनाच्या मागणीनुसार उक्त तपशिलाप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानानुसार यावर्षी मा. महासभेने गतवर्षी मान्यता दिल्याप्रमाणेच सन २००९-१० या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान दिल्याने एकुण रक्कम रु. ९५.६२ लाख खर्च झालेला आहे.

तरी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांस सन २००९-१० चे सानुग्रह अनुदान वाटप करणेस झालेल्या खर्चास मा. महासभेची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, आपण सानुग्रह अनुदान प्रत्येक वर्षी देतो. तर असे असताना आपल्यावर अशी कार्योत्तर मंजुरी घेण्याची वेळ का येते? आपण हे सानुग्रह अनुदान हा विषय दोन महिने अगोदर यायला पाहिजे. आणि तो मंजुर होऊन कर्मचाऱ्यांना तो देण्यात यावा. त्यांना उसणवारीने पैसे घेऊन सण करण्याची गरज का यावी?

**मा. महापौर :-**

साहेब, आचारसंहिता लागल्यामुळे.......

**अरूण कदम :-**

आचारसंहिता वगैरे अचानक येत नाही. माझी एक सुचना आहे की, पुढच्या वर्षी दोन महिने अगोदर सानुग्रह अनुदानाची मंजुरी घेण्यात येऊन कर्मचाऱ्यांना त्यांचा हक्क वेळेवर देण्यात यावा.

**मा. महापौर :-**

या विषयाची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**अरूम कदम :-**

पुढच्या वर्षी दोन-तीन महिने अगोदर हा विषय घ्यावा आणि त्याला मंजुरी घेऊन वेळेवर देण्यात यावा. अशी एक सुचना आहे.

**मा. आयुक्त :-**

वेळेवरच दिला आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ६७ :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल – १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २००९-१० या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. ७५००/- |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १००००/- |
| ३) | कास्ट्राईब कर्मचारी महासंघ | रु. ८०००/- |
| ४) | श्रमजीवी वाराई माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना (रजि.) | रु. ८०००/- |

सन २०१०-११ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष ‘‘संकिर्ण’’ ‘फ’ (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे. महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचारी** | **कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००८-०९** | **सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेले अनुदान (२००८-०९)** | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १३९५ | रु. ५८३०/- | ८१,३२,८५०/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०० | रु. ५८३०/- | ११,५७,७३८/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना, | २ + २ + १ = ५ | रु. ३६३०/- | १८,१५०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ७० | रु. ३६३०/- | २,४४,४४६/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ९ | रु. ११००/- | ९,२५८/- |
| | | | **एकुण** | **९५,६२,४४२/-** |

परंतु यावर्षी दि. ३१/०८/२०१० रोजी पासुन राज्यात राज्य निवडणुक आयोगाने विधान सभेची आंचार संहिता लागु केलेली आहे. राज्यात आचारसंहिता लागु असल्यामुळे महानगरपालिकेची आमसभा सुध्दा घेता येत नाही. परंतु आचांर संहिता कालावधीत दिवाळी आल्यामुळे दि. २७/११/२००२ च्या शासनाचे पत्रान्वये व कर्मचारी संघटनाच्या मागणीनुसार उक्त तपशिलाप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानानुसार यावर्षी मा. महासभेने गतवर्षी मान्यता दिल्याप्रमाणेच सन २००९-१० या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान दिल्याने एकुण रक्कम रु. ९५.६२ लाख खर्च झालेला आहे.

तरी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांस सन २००९-१० चे सानुग्रह अनुदान वाटप करणेस झालेल्या खर्चास मा. महासभेची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, संगणकचालक व लघुलेखक यांचेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही विषयपत्रिकेवर लिहिता, कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. आणि पुढे देता की, सभागृहाने निर्णय घ्यावा. म्हणजे कार्योत्तर मंजुरी पाहिजे की, सभागृहाचा निर्णय पाहिजे? मा. आयुक्तांनी सांगावे की, मी दिलेले आहे. हे त्यांनी मान्य केले पाहिजे. आणि त्यांनी सभागृहाची मागणीच नाही केली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

कार्योत्तर मंजुरी मिळावी म्हणूनच प्रस्ताव पाठवला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण तुम्ही शेवटी काय लिहिले आहे?

**प्रभात पाटील :-**

त्यांनी जी चुक काढली आहे. प्रशासनाने लक्षात घ्या की, आपण दिवाळीच्या अगोदर जो अजेंडा दिली तीच प्रत परत दिली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

अजेंडावर पूर्ण मा. आयुक्तांचे कुठेतरी दिसून येते की, सानुग्रह अनुदान देऊ नये. त्यांनी सगळी माहिती तशी दिली आहे. हा भार पडला आहे, तो भार पडला. देऊ नये. आत्ता हा खरोखर सभागृहाचा अधिकार आहे, किती द्यायचे, किती द्यायचे नाही.

**मा. आयुक्त :-**

या विषयामध्ये प्रशासनाचे काही चुकीचे नाही. हा विषय जो दिला होता, हा विषय मंजुरीसाठी दिला होता. म्हणजे दिवाळीपूर्वी ही प्रस्तावना पाठवली होती. परंतु, आचारसंहिता लागल्यामुळे सभा झाली नाही. पण गोषवारा तोच राहिला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण तुम्ही दिले पाहिजे ना?

**नरेंद्र मेहता :-**

तो सभागृहाचा अधिकार आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यावेळेला कमी जास्त रक्कम होऊ शकते म्हणून निर्णयासाठी सादर म्हटले होते.

**नरेंद्र मेहता :-**

पण तुम्ही ऑलरेडी देऊन टाकले आहेत ना?

**मा. आयुक्त :-**

देऊन टाकले म्हणजे त्यानंतर, सब्जेक्ट पाठवल्यानंतर आचारसंहिता लागली.

**नरेंद्र मेहता :-**

हा सभागृहाचा अधिकार आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

ज्यावेळेला अजेंडावर आला त्यावेळेला गोषवारा बदलून द्यायला पाहिजे होते.

(सभागृहात गोंधळ )

**मा. आयुक्त :-**

रक्कम मागच्या वर्षी जो मा. महासभेने निर्णय घेतला होता त्याप्रमाणे अदा केले.

**नरेंद्र मेहता :-**

मग ते अधिकार तुम्हाला नाही ना?

**मा. आयुक्त :-**

अधिकार नाही म्हणून तर कार्योत्तर मंजुरीसाठी आणला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही दिल्यानंतर आमच्याकडून मंजुरी मागता.

**मा. आयुक्त :-**

नामंजुर करा. पगारातून वसुल करतो.

(सभागृहात गोंधळ )

**स्नेहा पांडे :-**

परमिशन नही दिया। अब निर्णय नही लिया गया तो दिया हुआ अनुदान वापस लोगे क्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही याच्यात दिले असते की, आचारसंहितेमुळे ही रक्कम देण्यात आलेली आहे. तरी याला कार्योत्तर मंजुरी मिळावी. तर बरोबर झाले असते.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण त्यांना दिवाळीला सानुग्रह अनुदान दिले याला तुमचा विरोध आहे का?

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि.२९/०९/२००६ च्या पत्रान्वये संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र तसेच सर्व विभागीय संगणकावर काम करणारे संगणक चालक व लघुलेखक हे सर्वही मिरा भाईंदर शहरातील स्थानिक रहिवासी असुन गेली अनेक वर्षे ते महानगरपालिकेत निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करुन आपली सेवा देत आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाची व्याप्ती लक्षात घेता मानधनावरील कार्यरत संगणक चालक व लघुलेखक यांची मा. महासभा दि.२०/०३/२०१०, ठराव क्र. ६५ नुसार एक दिवासाचा तांत्रिक खंड देवुन मा. महासभा दि. १८/०६/२००९, ठराव क्र. ५ नुसार संगणक चालक यांना रु. ५०००/- (२६ दिवसांसाठी) व लघुलेखक रु. ६०००/- (२६ दिवसांसाठी) याप्रमाणे मानधनावर नेमुणक केलेली असुन मुदतवाढ दि.०१/११/२०१० रोजी संपत असल्याने महानगरपालिकेतील अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाची व्याप्ती लक्षात घेता कार्यरत सर्व संगणक चालक व लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये दि. ३१/११/२०१० पासुन अकरा महिन्यासाठी रु.६,५००/- संगणक चालक व रु.७,५००/- लघुलेखक यांना ठोक मानधनावर मुदतवाढ देणेस हि सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, माझी याच्यात अशी विनंती आहे की, मागच्या वेळेला हा विषय आला होता. या विषयामध्ये एक पत्रक दाखवले गेले होते की, अमुक एक महापालिकेने ते घ्यायला नकार दिलेला आहे, म्हणजे त्यांना परमनन्ट करायला. परंतु, माझ्याकडे आत्ता ऑर्डर उपलब्ध नाही. पण माझ्याकडे आहे. अर्ध्या तासाने मी तुम्हाला ऑर्डर टेंडर करतो, तुम्हाला देतो. मुंबई हायकोर्टाने नाशिक महानगरपालिकेच्या ठेका पध्दतीच्या दोन कर्मचाऱ्यांना नाशिक महापालिका वर्सेस त्या दोन पार्टी, जे ठेका पध्दतीवर होते, त्यांना कायमस्वरूपी कामावर नेमणुक करा. असे आदेश मुंबई हायकोर्टाच्या खंडपीठाने दिलेले आहेत. या सर्वांचा सांगोपांग विचार करता गेल्या अनेक वर्षापासून हा विषय आपल्याकडे सारखा सारखा सहा-सहा महिन्यांनी आपल्याकडे येतो आहे. त्या आदेशाचा आधार घेऊन आपण ह्या लोकांना जर कायमस्वरूपी केले तर मला वाटत नाही, कुठल्या गव्हर्नमेंटच्या पत्राची आपल्याला भिती वाटावी. माझी अशी या ठरावात सुचना आहे. ती तुम्ही नोंद करून घ्या. माझा आदेश मी तुम्हाला पंधरा मिनिटात देतो. आणायला माणूस पाठवलेला आहे. त्या आदेशानुसार आपण यांना कायमस्वरूपी घेऊ शकतो का? कारण उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची ही ऑर्डर आहे. सिंगल बेंच नाही, डबल बेंच आहे, डिव्हीजनल बेंच आहे. तो एक कायदा झाला.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

श्री. मिलन म्हात्रे साहेब, आपण मा. आयुक्तांकडे या विषयावर आदेश घेऊन जा आणि मा. आयुक्त साहेबांशी या विषयावर चर्चा करा.

**मिलन म्हात्रे :-**

पण या ठरावात माझी सुचना संलग्न करून घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

शक्य असेल तर आपल्या मताशी आम्ही सहमत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

शक्य आहे. प्रत्येक बाबतीत आमच्यासारख्याने कोर्टात जायचे. मग आदेश आणायचा आणि मग तुम्ही नोकरभरती करायची आणि भलत्या-सलत्याने आपली-आपली मंडळी घुसवायची हे त्रिकाल चाललेले आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण मा. आयुक्त साहेबांसी चर्चा करावी.

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा, प्रश्न निराळा आहे. हा ठराव झाला आहे. या ठरावामध्ये माझी सुचना तुम्ही नमुद करून घ्या. पुढे मी चर्चा करतोच आहे. मा. आयुक्तांशी करू, मा. महापौरांशी करू, तुमच्याशी करू, सगळ्यांशी करू. आणि तुम्हाला प्रत्येकाला मी एक-एक कॉपी देतो आहे. लॉ ऑफीसरनापण देतो आहे.

**अनिल सावंत :-**

यांच्या सुचनेला माझे अनुमोदन घ्या.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, ही जर सुचना घेतली तर श्रीम. प्रभाताई यांनी जो ठराव मांडला आहे. त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. मग सुचना आणि ठरावाची दोन्ही अंमलबजावणी करावी लागेल.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांची सुचना आणि ठराव वेगळे आहेत. मुदतवाढ करणे आणि मानधन देणे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मानधनाचा विषय नाही. हा जो त्यांनी अकरा महिन्याचा ठराव केला. मला सांगा आजपासून त्यांना या ठरावनुसार तुम्हाला हक्काने ठेका पध्दतीने घ्यायचा आधार आहे. आणि मी जे सांगतो त्याचा

तुम्हाला भविष्यात विचार करायचा आहे. आणि त्याच्यावर कारवाई करायची आहे. हे दोन फरक आहेत. आज त्यांच्याकडे काहीच नाही. त्यांना असेच मेहेरबानी खात्यावर ठेवलेले आहे. त्यांच्याकडे ठराव काहीच नाही. त्याकरिता हा जो ठराव आहे हा ॲक्टीव्हेटसुध्दा राहणार आणि तो ठराव आपण वियोग पण करू शकतो किंवा नेक्स्ट मिटींगला तो ठराव आपण कायमस्वरूपी घेण्याचापण घेऊ शकतो. उच्च न्यायालयाचा आदेश वाचा. मी काही घाई करत नाही. पण ही माझी सुचना तुम्ही याच्यात ॲड करून घ्या. मी सुचना दिली असे नुमद करा. कारण मी आत्ता लेखी देतो आहे. कारण त्याच्यात पिटीशन नंबर टाकायला लागेल. आणि पार्ट्यांची नावे टाकायला लागतील. अगदी व्यवस्थित आहे, ठेका पध्दीतीने आणि आपण काय नवीन करत नाही. बांधकाम खात्यामध्ये जेवढे जेई भरलेले आहेत. हे सगळे ठेका पध्दतीचे होते. आणि त्यांना सगळ्यांना आपण कायमस्वरूपी आस्थापनेवर घेतलेले आहे. एकीकडे एक न्याय, दुसरीकडे दुसरा न्याय हे चालायचे नाही. कारण तीसुध्दा माहितीच्या अधिकारात मी माहिती काढली. आपल्याकडे किती ठेका पध्दतीचे काल-परवा आलेले लोक आत्ता आस्थापनेवर कायम झाले आहेत. साहेब, हा गंभीर विषय आहे. आत्ता आस्थापनेमध्ये आपल्या इकडची स्थानिक मुले जास्त आहेत. या मिरा-भाईंदरच्या पंचक्रोशीतील स्थानिक माणसे आहेत. आपल्याच आस्थापनेवर सर्वत्र महाराष्ट्रातून आलेली माणसे, म्हणजे एम्प्लॉईज एक-दोन वर्षामध्ये कायम होतात. आणि आपल्या इकडच्या मुलांसाठी आपण दरवेळेस मा. महासभेमध्ये वाद घालतो. हा डिफरन्स चालणार नाही. त्याकरिता मी ही ऑर्डर देतो. आपण काय तो निर्णय घ्यावा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेबस मुळात ‘ड’ वर्ग महापालिकेला आस्थापना खर्च ३५ टक्के वर बाईंडेड ठेवलेला आहे. त्यापुढे १ टक्का गेला तरी पदे मंजुर होत नाहीत. आणि पद मंजुर असल्याशिवाय त्या पदावर कायम करण्याचा कोणताही निर्णय होऊ शकणार नाही. नाशिक महापालिकेचा जो निर्णय झालेला आहे. तो वाचून घेऊन मग त्यावर आपला रिप्लाय देणे सोयीचे होईल. मुळात पदमंजुर झाल्याशिवाय कुठल्याही पदावर नोकरीवर कायम करा अशी आर्डर होणार नाही. पद मंजुरीची जी कॅटेगिरी आहे........

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण पदाचा प्रस्ताव पाठवला आहे. त्याचा फॉलो केला का?

**मा. आयुक्त :-**

पद मंजुरीसाठी आपण मा. महासभेचा ठराव घेऊन आपण पाठवला आहे ‘ड’ वर्ग महापालिकेला ३५ टक्के च्या आस्थापनेच्या खर्चाच्या वर जाता येणार नाही. ते न गेल्यामुळे पद मंजुर होत नाहीत. आणि पदम मंजुर झाल्याशिवाय कायम करता येणार नाही. त्यामुळे पद मंजुर असल्याशिवाय त्या पदावर नेमणुक करा अशी आर्डर होऊ शकत नाही. त्यामुळे हायकोर्टाची नाशिक महापालिकेसंबंधी जी ऑर्डर झालेली आहे. ती वाचून घेऊ आणि त्यानंतर पुढे काय करता येईल ते बघू.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मला एका ह्याचा खुलासा करा. फायर ब्रिगेडमध्ये मजुर कुठे लागतात? अग्निशमन केंद्रात मजुर हा भाग कुठे आहे का? आस्थापनेने उत्तर द्यावे आणि किती मजुर आहेत तेही सांगावे. आणि ते काय काम करतात? साहेब, सगळ्या आस्थापनेचा मला अभ्यास आहे. फक्त अग्नीशमन नाही. त्यांनी मजुर किती आहेत ते सांगावे.

**संभाजी पानपट्टे सो., (मा.उपायुक्त):-**

साहेब, वीस मजुर होते. आपल्याकडे दुसरी पदे मंजुर नव्हती. तात्पुरती व्यवस्था केली होती.

**मिलन म्हात्रे :-**

हळू-हळू सांगा. फायरब्रिगेडमध्ये मजूर किती आहेत?

**संभाजी पानपट्टे सो., (मा. उपायुक्त ):-**

होते ना?

**मिलन म्हात्रे :-**

आहेत किती?

**मा. आयुक्त :-**

त्यांना पूर्ण बोलू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

होते म्हणजे काय? भूतकाळ? आत्ता कुठे आहेत? हरवले आहेत? होते म्हणजे काय? अजूनही आस्थापनेवर आहेत. की तुम्ही निलंबीत केले?

**मा. आयुक्त :-**

साहेब, तुमचे ऐकून उत्तर द्यायला लागले आहेत त्यांचे पूर्ण वाक्य झाल्यानंतर परत उठून उभे राहा.

**संभाजी पानपट्टे सो., (मा. उपायुक्त ):-**

यापूर्वी अग्नीशमन विभागामध्ये फायरमनच्या पोस्ट मंजूर नव्हत्या. तात्पुरती व्यवस्था म्हणून आपण मजूराची मंजूर पदे हेती. ते मजूर आपण फक्त अग्नीशमनला सेवा वर्ग केली होती आणिती सेवा आपण त्याच्या मार्फत घेत होतो.

**मिलन म्हात्रे :-**

हे बरोबर आहे ना?

**संभाजी पानपट्टे सो., (मा. उपायुक्त ):-**

हे बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे इकडची पदे तुम्ही तिकडे वापरली.

**संभाजी पानपट्टे सो., (मा. उपायुक्त ):-**

साहेब, तात्पुरती व्यवस्था म्हणून केली होती.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही पण तात्पुरतीच बोलतो. तुम्ही ते केले ना? कायदा मोडला ना? जिकडे ते केले, इकडेपण तेच करा. श्री. पानपट्टे साहेब हे जे आम्ही बोलतो ते सगळे तुम्ही आम्हाला शिकवता. आम्हाला आभाळातून ब्रम्हज्ञान येत नाही. हे जे सगळे होते, त्या भरत्या, त्याच्यामध्ये रोष्टर, नंतर मंत्र्यांचे फोन, नातेवाईकाचे फोन, कोण कॅन्डीडेट, त्यांची कॅटेगरी काय.हे सगळे आम्हाला कागद वाचून कळते. पहिले तुम्ही चुका करता आणि मग आम्ही याच्यातून शिकतो, चुक कशी करायची? आपल्या ठरावामध्ये ५०-५० टक्क्याचे रोष्टर असतानासुध्दा ७५-५० चे रोष्टर करायला यांना अधिकार कोणी दिला? हा गंभीर विषय आहे. आपण इकडे बसलो आहे. सभागृहाचा वापर करतात. वाटेल तशी भरती चालली आहे. कोणाचे लक्ष नाही. कायद्याच्या चौकटीत बोलले म्हणजे कायदा होत नाही. मला त्यांना विचारायचे आहेकी, ७५ टक्के चा तुमचा जो रेशो होता तो ५० टक्के चा रेशो ७५ वर कोणी आणला? आणि कुठल्या मा. महासभेने मंजुरी दिली की कुठल्या मा. स्थायी समितीच्या सभापतींनी मंजुरी दिली आहे. आज सरळ-सरळ जिकडे सोयीस्कर आहे तिकडे ७५-५०. जिकडे सोयीस्कर नाही तिकडे ५०-५०.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, हा विषय कुठला कुठे चालला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

नियम कायदा बनवताना सांगोपांग विचार करायचा असतो. या विषयात मी विषय नसता तर मजुराचा विषय निघाला नसता.

**मा. आयुक्त :-**

मजुराचा विषय का निघाला याचे उत्तर द्यायलाच मी उभा राहिलो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी दिले ना. त्यांनी दिले ते चुकीचे आहे का?

**मा. आयुक्त :-**

त्याचे तुम्हाला परत सविस्तर सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी त्यांची सोय केली.

**मा. आयुक्त :-**

या मा. महासभेमध्ये आरोग्य विभाग आणि गार्डन विभाग हे प्रायव्हेटीकरण केल्याने ठेका पध्दतीने कामगार घ्यायला सुरू केले. आणि पूर्वी आरोग्य विभागामध्ये आणि गार्डन विभागामध्ये जे परमनन्ट कामगार काम करत होते त्यांना कुठे कामाला लावायचे हा प्रश्न पडला, म्हणून जिकडे तिकडे वर्ग केले. याचा अर्थ असा नाही की, नेमणुकीच्या पदावर आरोग्य विभागाचे ठेका पध्दतीने सुरू झाले. नंतर गार्डन विभाग ठेका पध्दतीने मेन्टेनन्स सुरू झाले. आणि परमनन्ट कामगार कुठे वापरायचे हा प्रश्न पडला म्हणून तिकडे तात्पुरत्या स्वरूपात वर्ग केले. याचा अर्थ इथे नेमणुक करून तिथे वापरले का? आरोग्य विभाग कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने चालवावे. मग तिथली परमनन्ट माणसांना काय बसून पगार द्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

ती माणसे आजच्या तारखेला कुठे काम करतात? फायर ब्रिगेडच्या आस्थापनेवर आहेत. आणि आज कुठे कार्यरत आहेत त्याचे आस्थापनेने उत्तर द्यावे.

**मा. आयुक्त :-**

बसून पगार देण्याऐवजी वेगवेगळ्या डिपार्टमेंटला कामाला दिलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मी मजुरांचे बोलतो.

**मा. आयुक्त :-**

याचा अर्थ मजुर पदे मंजूर करून घेऊन अग्निशमनकडे का वापरले? याच पध्दतीने संगणक ........

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सभागृहाची दिशाभूल करू नका. जे वीस मजुर फायर ब्रिगेडला आहेत ते आजही तिकडे नाहीत. हे तुम्हाला माहिती आहे का? आस्थापनेने जरा त्याचा खुलासा करावा. तुम्ही जे आत्ता बोललात, तुम्हाला पण याच्यातले माहिती नाही.

**मा. महापौर :-**

श्री. मिलन म्हात्रे, बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

बसून घ्या म्हणजे काय? त्यांनी जे वीस मजूर सांगितले ते आजही फायर ब्रिगेडमध्ये नाहीत. त्यांनी फायर ब्रिग्रेडचे रोष्टर दाखवावे. आपल्याला प्रत्येक विषयावर कायदे, नियम, पत्रके आणून दाखवतील म्हणजे काय चालले आहे? तुम्ही रोष्टर दाखवा. फायर ब्रिगेडला वीस मजूर कुठे आहेत? तुम्ही फायर ब्रिगेडमध्ये वर्ग केले आहेत, मग ते फायरब्रिडेमध्ये कुठे आहेत त्याची आस्थापनाने माहिती द्यावी. आम्हाला त्या फायरब्रिगेड मधलीच माहिती पाहिजे.

**गोविंद परब :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. अग्नीशमन विभागात पूर्वी दहा पदे मंजूर होती. आणि त्यावेळेला अग्नीशमन विभाग सक्षमतेने चालावे म्हणून आरोग्य विभाग आणि वन विभागातील सफाई कामगार आणि मजुर, तिथे गाड्या जास्त होत्या आणि तीन शिफ्टमध्ये गाड्या चालवाव्या म्हणून प्रशासनाने मजुर दिलेले होते. आणि आत्ता गेल्यावर्षी जूनमध्ये एकशे ब्यान्नव पदे मंजुर झाल्यावर ती भरल्यावर आत्ता आपण नवीन पदे भरली. पूर्वी पदे मंजुर नसल्यामुळे आपण तिकडचे मजुर आणि सफाई कामगार अग्निशमन विभागात गाड्या जास्त होत्या आणि कामगार कमी पडू नयेत म्हणून कर्मचारी तिकडे पाठवलेले.

**मिलन म्हात्रे :-**

मग ते आत्ता काय करतात?

**गोविंद परब :-**

आत्ता ते काही अग्निशमन विभागातच काम करतात.

**मिलन म्हात्रे :-**

कोणकोण आहेत? नावे द्या.

**गोविंद परब :-**

नावे आत्ता आणली नाहीत.

**मा. महापौर :-**

हा विषय नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय नाही असे बोलु नका.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

श्री. म्हात्रे साहेब, हा विषय नव्हता. तुम्ही आत्ता नावे सांगणार आणि सगळे रजिस्टर मागवणार. तुम्ही विषयाला सोडून बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

मी विषयाला पकडूनच बोलतो आहे. हा आस्थापनेचा प्रश्न आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हा संगणक चालकांचा विषय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला कळले नाही, मला कळलेले आहे. त्यांनी आस्थापनेचा खर्च सांगितला त्याच्यात सगळे आले.

**मा. आयुक्त :-**

साहेब, हा विषय तुम्ही काढणार हे माहित असते तर कोण कोण मजुर काय काय काम करतात? किती तारखेला नेमणूक झाली आहे हे आम्ही घेऊन आलो असतो.

**मिलन म्हात्रे :-**

आणायला पाहिजे ना. तुम्ही जेव्हा आस्थापनेचा खर्च सांगितला तेव्हा तो विषय आला.

**प्रकरण क्र. ६७ :-**

संगणकचालक व लघुलेखक यांचेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची

महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि.२९/०९/२००६ च्या पत्रान्वये संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र तसेच सर्व विभागीय संगणकावर काम करणारे संगणक चालक व लघुलेखक हे सर्वही मिरा भाईंदर शहरातील स्थानिक रहिवासी असुन गेली अनेक वर्षे ते महानगरपालिकेत निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करुन आपली सेवा देत आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाची व्याप्ती लक्षात घेता मानधनावरील कार्यरत संगणक चालक व लघुलेखक यांची मा. महासभा दि.२०/०३/२०१०, ठराव क्र. ६५ नुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन मा. महासभा दि. १८/०६/२००९, ठराव क्र. ५ नुसार संगणक चालक यांना रु. ५०००/- (२६ दिवसांसाठी) व लघुलेखक रु. ६०००/- (२६ दिवसांसाठी) याप्रमाणे मानधनावर नेमुणक केलेली असुन मुदतवाढ दि.०१/११/२०१० रोजी संपत असल्याने महानगरपालिकेतील अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाची व्याप्ती लक्षात घेता कार्यरत सर्व संगणक चालक व लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये दि. ३१/११/२०१० पासुन अकरा महिन्यासाठी रु.६,५००/- संगणक चालक व रु.७,५००/- लघुलेखक यांना ठोक मानधनावर मुदतवाढ देणेस हि सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

सदर प्रकरणी नाशिक महानगरपालिका विरुध्द श्री. भगवान फकीरचंन्द मुनदाहर आणि अन्य मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल व निर्णय झालेला निकाल केस क्र. २१५५, २७०७, २७०८, २७१६, २७१९, ३१३२/२००७ अनुसार ठेका पध्दतीचे कर्मचारी यांना ज्याप्रमाणे कायम आस्थापनेवर घेण्याचे आदेश दिले आहेत त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेत सध्या ठेका पध्दतीने कार्यरत असलेले संगणक चालक यांनासुध्दा कायमस्वरुपी मनपा आस्थापनेवर घेण्यात यावे अशी माझी सुचना उपरोक्त ठरावात समाविष्ट करावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८, मिरारोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी खाजगी वैद्यकिय तज्ञ यांची सेवा मानद तत्तावर घेणे व विविध वैद्यकिय सेवा शुल्कांचे दर फेरविचार विनिमय करुन निश्चित करणेबाबत.

**अनिल सावंत :-**

मिरारोड येथील प्रस्तावित ५० खाटांच्या भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालयासाठी वैद्यकीय तज्ञ व इतर कर्मचारी वर्गाची दोन वेळा वृत्तपत्रात जाहिरात देऊनही १) बालरोग तज्ञ (पिडियाट्रिशियन) २) वैद्यकीय अधिक्षक (मेडिकल सुप्रिन्टेंडंट) ३) बधिरीकरण तज्ञ (ॲनेस्थोटिस्ट) ४) भिषक (फिजिशियन) ५) शल्य विशारद (जनरल सर्जन) ही पदे अजुनही रिक्त असल्याने राज्य शासनाकडून प्रतिनियुक्ती होईपर्यत विलंब होणार असल्यामुळे खासगी वैद्यकीय तज्ञांची सेवा मानद तत्वावर घेऊन सदर रूग्णालय लवकरात लवकर चालू करण्यात यावे. ज्या विभागासाठी कायमस्वरूपी वैद्यकीय तज्ञ मिळालेले नाहीत असे विभाग मानद तज्ञांची सेवा घेऊन चालू करण्यात येतील. स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र विभागासाठी कायमस्वरूपी तज्ञ नेमलेले आहेत. तरीही सदर विभाग २४ तास व्यवस्थित व सुरळीत चालू होईपर्यंत मानद तज्ञांची सेवा घेणे योग्य राहील.

सर्व विभागात प्रथम बाह्यरूग्ण विभाग सुरू करण्यात यावा व मानद तज्ञांच्या सल्ल्याने नंतर आंतररूग्ण विभाग सुरू करण्यात यावेत. सुरूवातीस मा. महासभेच्या ठरावानुसार (मा. महासभा दि. ०१/०७/२००८ ठराव क्र. २५) मान्यता प्राप्त विभाग चालू करणे व सदर विभाग व्यवस्थित व सुरळीत चालू झाल्यानंतर इतर विभागांची फक्त बाह्यरूग्ण व्यवस्था चालू करणे योग्य राहील, जसे की डोळे, त्वचा, कान, नाक व घसा, मनोविकार इ. सदर मानद तज्ञ घेण्याच्या मा. आयुक्त सो. यांच्या निर्देशानानुसार त्यांच्या प्रतिनिधींशी दि. ०५/१०/१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार त्यांना मानधन देण्याचे सुचविले आहे. त्यासाठी मानद तज्ञांना बाह्यरूग्ण विभागासाठी प्रतिदिन रू. ३५०/- मानधन देण्यात यावे.

तसेच रूग्णालयामध्ये भविष्यात नवीन सेवा सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांचे दर ठरविण्याचे अधिकार व रूग्णालय चालविण्याबाबत वेळोवेळी येणाऱ्या अडचणीवर निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांचे असतील.

सदर बिल्डींगमध्ये तळमजल्यावर राष्ट्रपिता महात्मा गांधी वाचनालय तसेच पहिल्या मजल्याच्या अर्ध्याभागात इ-वाचनालय (E-Library) उच्चशिक्षित विद्यार्थ्यांसाठी सुरू करावे. वाचनालयासाठी ग्रंथपालाचे एक पद शासन मान्यतेसाठी पाठविण्यास व तोपर्यंत सदर पद मा. आयुक्त ठरवतील त्या ठोक मासिक दराने करारतत्वार भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर इमारतीतील भारतरत्न राजीवगांधी रक्तपेढी चालविण्याकरिता मे. नवजीवन मेडिकल रिलिफ ॲन्ड रिसर्च फाऊंडेशन या अशासकीय संस्थेस नेमण्यात आलेले आहे. याकरिता त्यांनी सर्व आवश्यक उपकरणे व साहित्य खरेदी केलेली आहेत. तसेच आवश्यक कर्मचारी वर्ग नेमलेला आहे. तसेच त्यांनी आंतर रूग्णांसाठी दिलेले दर इतर शासकीय संस्थेच्या दरांपेक्षा कमी असून बीपीएल आणि कॅन्सरग्रस्त रूग्णांसाठी मोफत रक्त पुरवठा करण्याचे मंजूर केलेले आहे.

अशाप्रकारे, सदर रूग्णालय चालू करणेकरिता नमुद केलेल्या सर्व विभागांकरिता मानद तत्वावर तज्ञ नेमणे, डायलेसिस विभागाकरिता मानद तत्वावर नेफ्रोलॉजिस्ट नेमणे, अपघात विभाग व आंतररूग्ण वॉर्डकरिता २ अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी मानधनतत्वावर नेमणे व त्यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव पदमंजूरीसाठी तात्काळ शासनाकडे पाठविणे, डायालिसिस युनिटसाठी आवश्यक १ नेफ्रोलॉजिस्ट, ३ स्टाफ नर्स व ३ तंत्रज्ञांची पदे शासनाकडे पदनिर्मितीसाठी पाठविणे तसेच १ स्त्रीरोग व प्रसुतितज्ञाच्या पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पदमंजूरीसाठी पाठविणे, लीनेन लॉन्ड्रीमध्ये धुवायला व इस्त्री करण्यासाठी ठेका देणे व रूग्णालयाच्या दैनंदिन साफसफाईसाठी हाऊस किपिंगसाठी ठेका देणे, रूग्णालयात भविष्यात उपलब्ध होणाऱ्या सेवासुविधांचे दर ठरविणे व वेळोवेळी येणाऱ्या अडचणीवर निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देणे, ग्रंथालयासाठी ग्रंथपालाचे एक पद शासन मान्यतेसाठी पाठवणे व तोपर्यंत सदर पद करारतत्वावर मा. आयुक्त ठरवतील त्या ठोक मासिक वेतनावर भरण्यास ही महासभा मंजूर देत आहे. तसेच तातडीने रूग्णालय चालू करावयाचे

असल्याने इतिवृत्ताच्या मंजूरीची वाट न पाहता ठरावाप्रमाणे तत्काळ कार्यवाही करण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

| अ. क्र. | सेवा | मा. महासभेने मंजूर केलेले जूने दर | कळवा रूग्णालयाचे दर | खाजगी प्रयोगशाळेचे दर | नवीन प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | बाह्य रूग्ण नोंदणी (७ दिवसाकरिता) | १० | १० (३ दिवसांसाठी) | - | २० फेरतपासणी रू ५/- |
| २. | आंतररूग्ण शुल्क प्रतिदिन | २५ | ६० | - | ५० |
| ३. | CBS / ESR | २५ | २५ | १८० | ५० |
| ४. | Smear for M.P | निःशुल्क | २५ | ८० | निःशुल्क |
| ५. | Ig M. Dengue | २५ | - | ७०० | ५० |
| ६. | Ig M. Lepto | २५ | - | ७०० | ५० |
| ७. | Widal Test | २५ | ४० | १५० | ५० |
| ८. | RFT (Renal Function Test) | २५ | ६० | ९०० | १०० |
| ९. | LFT (Liver Function Test) | २५ | १४० | ५०० | १०० |
| १०. | Random / Fasting/ Postprandial Blood sugar | २५ | ३५ | ५० | २५ |
| ११. | Lipid Profile | २५ | १०० | ४५० | १०० |
| १२. | Serum Calcium | २५ | ३५ | १२० | ५० |
| १३. | Serum Phosphorus | २५ | ३५ | ११० | ५० |
| १४. | Urine – Rotuine / Microscopy | २० | २५ | ६० | ५० |
| १५. | Stool - Rotuine / Microscopy | २५ | २५ | ६० | ३० |
| १६. | HIV Testing (ELISA) | निःशुल्क | १२५ | ४०० | १०० |
| १७. | HBsAg | २५ | १२५ | ३५० | १०० |
| १८. | BT / CT / PT | २५ | २५ | १०० | २५ |
| १९. | PTT | २५ | २५ | २५० | ४० |
| २०. | Sputum for AFB | निःशुल्क | २५ | ५०० | निःशुल्क |
| २१. | UPT | ४५ | ४० | १५० | ५० |
| २२. | ECG | २० | ४० | २०० | ५० |

उपरोक्त प्रयोगशाळा तपासण्या करण्यासाठी रूग्णालयात प्रयोगशाळा उपलब्ध आहे. परंतु तपासणीनंतर अंतिम अहवाल देणेकरीता एक पॅथोलॉजिस्ट मानद तत्वावर घेणे गरजेचे राहणार आहे व याकरीता त्यास मासिक मानधन रू. ५,०००/- अदा करणे योग्य राहील.

मिरारोड रूग्णालयामध्ये शल्यविशारद हे पद रिक्त आहे त्यामुळे खाली दर्शविलेल्या शस्त्रक्रिया करण्यात येणार असून त्याकरिता मानद तत्वावर नेमलेल्या तज्ञांना प्रती शस्त्रक्रिया त्यांच्या कामाबद्दल फी देणे योग्य राहील, तसेच या शस्त्रक्रियांच्या यादीचा व वैद्यकीय सेवा शुःल्काचा फलक रूग्णालयात दर्शनी भागात लावण्यात येणार आहे. मानद तत्वावरील वैद्यकीय व बधीरीकरण तज्ञांना खाली दर्शविल्याप्रमाणे प्रती शस्त्रक्रिया रक्कम देणे योग्य राहील व लहान शस्त्रक्रियेकरीता गरज भासल्यास त्यांना उपस्थित रहावे लागल्यास रू. ५००/- देणे योग्य राहील. अशाप्रकारे फक्त खाली दर्शविलेल्या लहान शस्त्रक्रिया रूग्णालयात केल्या जातील व इतर मोठया शस्त्रक्रिया पुढील टप्प्यात करण्याचे महानगपालिकेकडून प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | सेवा | जुने मंजूर दर | कळवा रूग्णा लयाचे दर | कळवा रूग्णा लयाचे बधीरी करण शुःल्क | एकुण | मानद तत्वावरील शल्य विशारद / स्त्रीरोगतज्ञ / अस्थीरोग इ. तज्ञांची फी | मानद तत्वा वरील बधीरी करण तज्ञांची फी | एकुण | खाजगी रूग्णलया कडून आकारण्या त येणारी फी | रूग्णां कडून आकार ण्यात येणारी प्रस्तावित फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Lymphnode Biopsy | १०० | ७५ | १५० | २२५ | ५०० | - | ५०० | २३०० | ११५० |
| २. | Lipoma (Small) excision | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २३०० | ११५० |
| ३. | Corn Removal | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २३०० | ११५० |
| ४. | Small CLW (Contusion/ Lacerated wound) suturing | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २३०० | ११५० |
| ५. | Cirumcision ↓ LA | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ५००० | २५०० |
| ६. | Abscess (I & D) (Incision and draingae) small ↓ LA | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| ७. | Sebaceous cyst removal ↓ LA | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| ८. | Nail removal | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २५०० | १२५० |
| ९. | Dermoid excision | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २५०० | १२५० |
| १०. | Granuloma / Sinus excusion | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २५०० | १२५० |
| ११. | Secondary suturing of wound | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| १२. | Small scar / hypertrophied scar excision | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| १३. | Keloid [ Intradermal Steroid Injection ] | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | १५०० | १५०० |
| १४. | Ganglion excision (wrist) | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २५०० | १२५० |
| १५. | Aspiration of cold abscess (Non dependant) | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| १६. | Foreign Bodies removal over | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | extrimities ↓ LA | | | | | | | | |
| १७. | Submucosal cyst (Lip) removal | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| १८. | Excision of small carbuncle (Diabetic) | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| १९. | Reduction of periphimosis | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | ३००० | १५०० |
| २०. | Surgery for Ingrowing toe nail | १०० | ४० | १५० | १९० | ५०० | - | ५०० | २५०० | १२५० |
| २१ | Excision of penduncula ted/ papillomma / fibroma | २०० | ४५० | २५० | ७०० | ५०० | - | ५०० | ५००० | २५०० |
| २२. | Normal Delivary 1st | निःशुल्क | २०० | - | २०० | ५०० | - | ५०० | १०००० | २००० |
| २३. | Normal Delivary 2nd | ५० | २५० | - | २५० | ५०० | - | ५०० | १०००० | ३००० |
| २४. | Normal Delivary 3rd | २५० | ६०० | - | ६०० | ५०० | - | ५०० | १०००० | ५००० |
| २५. | LSCS (Caessarian Section) | २०० | ५०० | २५० | ७५० | २००० | ७५० | २७५० | ३०००० | ७००० |
| २६. | Hemodialysis Per Cycle | १५० | - | - | - | २०० | - | २०० | १००० | ३५० |
| २७. | X-ray Per Film | ३० | ५० | - | ५० | १५ | - | १५ | २०० | ३० |
| २८. | Ultra Sonography | १०० | - | - | - | १०० | - | १०० | ८०० | २०० |

**सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक डॉ. राजेंद्र जैन व अनुमोदक श्री. प्रमोद सामंत यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

१) रूग्णालयामध्ये मेडिकल स्टोअर्स असणे गरजेचे आहे त्यामुळे महानगरपालिकेस खालील गोष्टींचा फायदा होईल.
२) रूग्णास २४ तास औषधे मिळण्यास सोईस्कर राहील जेणेकरून रात्री औषधे व साधनसामुग्री आणण्यास त्रास होणार नाही.
३) मेडिकल स्टोर्स Out Sourcing केल्याने त्या मालकाकडून आपणास मासीक भाडे व डिपॉझिट मिळेल.
४) सदर गोष्टीमुळे वार्षिक किती औषधे लागली याचे रेकॉर्ड महानगपालिकेस ठेवता येईल.
५) तसेच मेडिकल स्टोअर्समुळे रूग्णांना सुट देण्यास मदत होईल.
६) रूग्णांना रोड क्रॉस करून औषधे आणण्यास गरज लागणार नाही.
७) Local Purchase / Medicine Replacement System बिलकुल नही रखी जाय।

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचा ठेका मुदतपूर्व रद्द करणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

हा सदरचा विषय आज आपल्याला घाई आहे हा विषय चर्चेचा आहे त्यामुळे पुढच्या सभेत घेण्यात यावा असा मी सभागृहाच्या मान्यतेने तो पुढे घेण्यात यावा म्हणजे पुढच्याच महासभेमध्ये घेण्यात यावा असा मी ठराव मांडते.

**भगवती शर्मा :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

कुठला विषय?

**नरेंद्र मेहता :-**

ठराव कायम करण्यासाठी वाचन करायला सांगितलेला नाही. आम्ही सांगितले आम्हाला ऐकु आलेले नाही.

**दिनेश नलावडे :-**

पुढचा विषय घ्या सचिव साहेब.

**मा. महापौर :-**

७० घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर साहेब, पहिला तुम्ही टॅक्स वाढीमध्ये टॅक्स वाढीचा विषय होता आम्ही तुम्हाला कल्पना दिली. तुम्ही ऐकले नाही. आज मला बोलायला लागत आहे.

**मा. महापौर :-**

प्रत्येक विषयावर तुम्ही बोलायला निघालेले आहेत.

**अरुण कदम :-**

ॲथोरिटी तुमच्याकडे आहे. सगळे विषय मंजुरच होणार आहेत पण सदस्यांचे मत ऐकून तर घ्या ना.

**नरेंद्र मेहता :-**

रेट वाढविण्याचे कारण काय?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

यांनी सांगितले की, ठराव मंजुर करताना तुम्ही वाचन करा. वाचन केल्यानंतर ठराव मंजुर झाला.

**प्रशांत पालांडे :-**

चर्चा व्हायला काय हरकत आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

चर्चा करायला हवी होती. चर्चा का केली नाही?

**दिनेश नलावडे :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या ना. ७० चे वाचन झालेले आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

रेट वाढविण्याची गरज काय पडली.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तुम्ही सोयीसुविधा अजुन दिलेली नाही आणि तुम्ही रेट वाढवायला सुरुवात केलीत अजून रुग्णालय चालु केलं नाही.

**अरुण कदम :-**

सभा दहा मिनिटात संपवा ना सगळे एकदा ठराव वाचा सगळे मंजुर आहेत आपण घरी जाऊया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज रुग्णालय कशासाठी तयार केले तुम्ही. गोरगरीबांना फायदा मिळण्यासाठी. तुम्ही अजुन सेवा सुरु केली नाही आणि तुम्ही तिप्पट दर वाढविले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

इतर महानगरपालिकेचे रेट बघा. कळवा महानगरपालिकेचे रेट दिलेले आहेत साहेब.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अजुन रुग्णालय सुरु झालेलेच नाही तुम्ही शहराला काय दाखविता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आधी रेट मंजुर व्हायला पाहिजेत साहेब, अहो जे स्पेशलिस्ट डॉक्टर आहेत ते स्पेशल मानधन तत्वावर घेणार आहेत. त्यासाठी ठराव पैसे रेटमध्ये नको.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ५० चे १०० केले. तुम्ही शहराला काय दाखवणार? काय सोयी देणार?

**अरुण कदम :-**

मा. महापौर साहेब, कशासाठी बोलवलत तुम्ही, कशासाठी घाट घातला तुम्ही? मंजुरी आज घेता त्याआधी ओपनिंगचा घाट घातला होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण तिथे ओपीडी सुरु केली. होती.

**अरुण कदम :-**

ओपीडी ओपनिंगसाठी आपण मुख्यमंत्र्यांना बोलावलं होतं का?

**अरुण कदम :-**

मा. मुख्यमंत्र्यांना फक्त ओपीडी ओपनिंगसाठी बोलावलं होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

बाकी जे स्पेशलिस्ट डॉक्टर आहे, सर्जन आहे, ॲनास्टेटीज आहेत यासाठी मानद तत्वावर घेण्यासाठी रेट मंजुर नको का व्हायला?

**अरुण कदम :-**

तुम्ही चर्चा करत नाहीत. ऐकून घेत नाही. तुमच्याकडे सभागृहामध्ये सदस्य संख्या जास्त आहे. तुम्ही ठराव मंजूर करुन घेऊ शकता. मग आम्हाला बोलायला द्यायचे नाही का तुम्हांला.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महासभा म्हणजे नगरसेवकाचा हक्क आहे ना. इथे पण बोलू देत नाही, तुम्ही ऐकत नाही. म्हणजे तुम्ही सांगणार तीच पूर्व दिशा आहे का? त्यांना जे मांडायचे आहे ते मांडू द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये टेंबा हॉस्पीटलचा प्रस्ताव आपल्याला हायकोर्टाच्या सहा महिन्याच्या कंम्पलशनच्या लिमिट आहेत. प्रशासन आपल्याला कुठे घेऊन जाते ते बघा. हा प्रस्ताव ॲक्च्युअली दोन वर्षापूर्वी आला होता. वैती साहेब त्यावेळी विरोधी पक्षनेते होते. त्याला विरोध झाला. तो प्रस्ताव आपल्याला हायकोर्टाच्या कंम्पलशनमुळे, तुम्हाला त्याबद्दल लॉ ऑफीसर बसलेले आहेत. टेंबा हॉस्पीटलचा पण प्रस्ताव एकत्र आला पाहिजे. पण तो मुद्दामहून आणला नाही. कशाकरीता, काय अडचण होती हो तुम्हाला प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा? तुम्हाला पद मंजूर होतात पाच-पाच लाख रु. घेऊन.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

गोषवारा तयार केला साहेब. पुढच्या महासभेमध्ये......

**मिलन म्हात्रे :-**

कारण काय? अहो कोर्टाची ऑर्डर वाचा. ज्यादिवशी तो ठराव आम्ही लेट पास करु ना त्यावेळी तुमच्या इतके आम्हीसुध्दा जबाबदार असणार आहोत. कोर्टाचे आदेश आहेत. चिफ जस्टीसचे आदेश आहेत. पण तुम्हाला त्याची किंमत नाही. दादा किती तरी वेळा पत्रव्यवहार केलेला आहे त्यांना सतर्क केले आहे. अशी ऑर्डर आहे. प्रस्ताव आणा मंजुरीला. अजूनपर्यंत आणलेला नाही म्हणजे चुका ह्यांनी करायच्या भोगायच्या आपण. ह्यांना अडचण काय आहे ते विचारा. आपण मंजूरी देत नाही.

**मधुसुदन पुरोहित :-**

विषय जास्त आहेत म्हणून चर्चा .......

**मा. महापौर :-**

पुढच्या मिटींगला हा विषय घेण्यात येणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बरेच आश्वासने झाले अजून विषय घेतलेला नाही. तुम्ही आता रुलिंग दिले ना, जर पुढच्या मिटींगला विषय आला नाही तर त्या अधिकाऱ्यावर काय कार्यवाही कराल असे आत्ता या मिटींगमध्ये उत्तर पाहिजे आम्हाला. तुम्ही काय कारवाई कराल, निलंबित कराल, आयुक्तांना घरी पाठवाल.

**मा. महापौर :-**

घेणार नाही तेव्हा ना.

**मिलन म्हात्रे :-**

तो मला निर्णय पाहिजे ना.

**मा. महापौर :-**

जेव्हा वेळ येईल तेव्हा काय करायचे आहे तेव्हा करेन.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याचा निर्णय पाहिजे आम्हांला.

**मा. महापौर :-**

वेळेवर करेन.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहाला आयुक्तांना घरी पाठवायचे पण पॉवर्स आहेत.

**मधुसुदन पुरोहित :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी आप अपने प्रश्न किजीए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, जर महापालिकेचे आपले जुने दर बघितले तर प्रत्येक दरामध्ये ५० ते ७५ टक्के वाढ केलेली आहे. रुग्णालये सुरु झालेली नाहीत. वैद्यकिय अधिकारी नाही. ही पण शंका आहे आज आपण प्रस्तावित केले आणि ही सेवा आपण देऊ शकतो की नाही त्याची पण महापालिकेला शाश्वती नाही. मा. आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब तुम्ही बोला. जर तुमच्याकडे आत्ता कुठलाही रुग्ण तपासणीसाठी येणार आहे. तुमच्याकडे सोयीसुविधा आहे. तुम्ही फक्त रेट दिलेले आहे. दाखवायला सर्वांना आम्ही रुग्णालय सुरु केलेले आहे. बाकी तुमच्याकडे काही नाही, झिरो आहे. मा. महापौर साहेब, उपमहापौर साहेब मी तुम्हाला विनंती करतोय, हा विषय तुम्ही अजून घाईमध्ये घेऊ नका. आपण काय सुविधा देऊ शकतो, या शहराला काय सोयी देऊ शकतो.

**मा. महापौर :-**

वर्तमानपत्रात जाहिरात केलेली आहे. एम.बी.बी.एस. डॉक्टर १०० रु. काम करणार असेल तर घेऊन या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी घेऊन आलो असतो ना तर मीच चालु केले असते तुम्हाला विचारलं नसते. हे तुम्ही सांगता ना तुम्ही बोलु शकत नाही. मस्करीवर जाऊ नका. खाजगी रुग्णालय तुम्हांला हेच द्यायचेय का? लोकांना खाजगी रुग्णालयात जायचा हाच विषय आहे का? याला आमच्या भारतीय जनता पक्षाचा विरोध आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

या शहरातील लोक किती वर्षांनी वाट बघतायत. याची मस्करी करताय तुम्ही. शहरातल्या सोयी सुविधांचा सर्वात मोठा प्रश्न आहे.

**नरेंद्र मेहता :-**

परिवहनचे काय झाले? कारण काय? गरज काय? तुम्ही घ्या ना विषय.

**मधुसुदन पुरोहित :-**

तुम्ही लाईनशीर घ्या ना.

**नरेंद्र मेहता :-**

कोणी घेतली कुठली मान्यता. आम्ही सांगितले घ्या तुम्ही मांडला आम्ही बोललो हॉस्पीटलचा चालु आहे. तुम्ही विषय कुठे घुसवला. आम्ही स्पष्ट हॉस्पीटलच्या विषयावर चर्चा करत होतो. परिवहनच्या विषयाला सुरुवात झाली नाही आणि तो विषय घ्यावा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर साहेब, ते पण होते माजी महापौर.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हा विषय मान्यतेने पुढे ढकलता येतो.

**नरेंद्र मेहता :-**

आमची मान्यता नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

बहुसंख्य सदस्यांची मान्यता आहे.

**भगवती शर्मा :-**

तुमची मान्यता काय करायची आम्हांला.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, घेता येईल का? आम्ही विरोध करतो. मतदान घ्या. महत्वाचा विषय आहे. शहरात बस सेवा चालु नाही आणि आपण म्हणता विषय पुढे ढकला.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचा ठेका मुदतपूर्व रद्द करणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, एकदा विषय झालेला आहे. परत कशाला घेता.

**प्रभात पाटील :-**

मी ठराव मांडला आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, महापौरांनी विषय पुढे ढकललेला असताना परत कशाला तुम्ही घेता.

**मधुसुदन पुरोहित :-**

जेव्हापर्यंत महासभा होणार नाही तोपर्यंत त्यांचा कारभार चालत राहिल.

**लक्ष्मण जंगम :-**

चर्चा करायची होती मग पुढे ढकलायचा नाही ना. पुढे ढकलला तर पुढेच ढकलला.

**नरेंद्र मेहता :-**

कोणी ढकलला पुढे?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

पुढे ढकलून पुढच्या मिटींगमध्ये चर्चा करा.

**अरूण कदम :-**

पुढे ढकलायचे प्रयोजन काय?

**मधुसुदन पुरोहित :-**

त्याचा अनैतिक कारभार पुढे चालु राहिल.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे तो विषय महत्वाचा आहे. त्या विषयावर बरीचशी चर्चा होणार आहे. आणि वेळेचे आपल्याला बंधन आहे. म्हणून तो विषय आपण पुढे ढकलतोय.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. दुसरा विषय पुढे घ्या ना.

**प्रभात पाटील :-**

मग घेतला ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही कशाला सांगता, कुठला विषय पुढे घ्यायचा तो.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही बोलता मी नाही बोलत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सभागृहाची मान्यता आहे.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

उनको आज भी लगता है की मै महापौर हु तुम्ही काय रुलिंग देता।

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही बोललो मी नाही बोललो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मतास टाकायचे आहे का?

**जुबेर इनामदार :-**

महापौर साहेब, माझी सुचना आहे. आम्हाला या विषयावर बरेच काही बोलायचे आहे. हात जोडून तुम्हाला विनंती करतोय हा विषय पुढच्या महासभेमध्ये घेण्यात यावा.

**शरद पाटील :-**

त्यांना बोलायचे म्हणून विषय पुढे आणि आम्हाला बोालायचय.

**लक्ष्मण जंगम :-**

महापौर साहेब, तुम्हाला बहुमताने सदस्यांनी सांगितले की पुढे ढकलायचा तुम्ही आणि आम्ही काही बहुसंख्येने सदस्यांनी सांगितले पुढे घ्या.

**प्रभात पाटील :-**

एक गोष्ट तुमच्या कानात शिरली की नाही मला माहित नाही. सभागृहाच्या पण, पण मी ऐकली. तुम्ही पण ऐकलेली नाही. पाठीमागून आपले एक सदस्य बोलले विषय पुढे ढकलायचा एवढ्यासाठी की, याचे अनैतिक काही चालणार नाही म्हणून कोण बोललं त्यांनी स्वतःहून प्रामाणिकपणे सांगावे नाहीतर मी सांगते. काय अनैतिक करतात. तुम्ही करता की आम्ही करतोय त्यांनी उत्तर द्यावे एक मधुसुदन पुरोहित यांनी अनैतिक शब्द वापरला. सिडी काढून वाजवा.

**मुधुसुदन पुरोहित :-**

काय झाले? मी नितीगत कारभार बोललो मी नितीगत कारभार, अनैतिकचा अर्थ काय? नितीगत कारभार आणि अनितिगत कारभार काय फरक आहे त्याच्यात.

**प्रभात पाटील :-**

त्याचा विचार करा तुम्ही .

**मुधुसुदन पुरोहित :-**

अनितिगतचा अर्थ काय होतो म्हणजे जो ठेकेदार आहे त्याला तुम्ही सहकार्य करताय याचा अर्थ असा झाला. शब्दोच्चार आम्हाला पण कळतात. मी म्हणालो विषय आता घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

पुढे एक गोष्ट लक्षात घ्या. आपण विषय रद्द केलेला नाही. हा विषय पुढच्या सभेमध्ये चर्चेला येईल. विषय होणार आहे. श्री. अरुण कदम आपला विषय आहे. विषय क्र. ७०, वरती वर्तमानपत्रात आपली बातमी आलेली आहे. तो विषय घेतोना आपण ह्या विषयावर चर्चा कराची असेल तर पुढच्या सभेमध्ये घेऊ. आम्ही चर्चा टाळत नाही. अनिमितता हा प्रकार इथे नाही. तो विषय संपणार नाही. म्हणून आम्ही पुढच्या सभेत घेतोय.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला आज पाहिजे तो विषय.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आम्ही आमच्या नियमाप्रमाणे करतो.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही आमचा ठराव मांडतो.

**अनंत पाटील :-**

परिवहनची अवस्था काय झाली आहे.

**मा. महापौर :-**

हा ठराव ६९ चा बहुमताने पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात येणार आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

७० बद्दल काय करायचे.

**मा. महापौर :-**

तो घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, आपण ७० जो अनुदानाचा विषय आहे तो घेऊन सभा तहकुब करत असाल तर...

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

नाही सभा तहकुब नाही, सभा आम्ही संपवतोय नंतर विषय घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, आमचे ऐकून घ्या नाहीतर ठराव मांडतो मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि. १०/१२/२०१० मधील प्रकरण क्र. ६९ ह्या विषया वरील चर्चा आजच्या महासभेतच व्हावा. तो पुढील महासभेमध्ये चर्चेसाठी घेवू नये असा ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

७० नंबरचा विषय घेऊन सभा तहकुब करणार आहात का?

**प्रभात पाटील :-**

एकीकडे वाचायला सांगता आणि तिकडे ठराव पण घेतात. काय चालले आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण जो ठराव दिलात तोच तर आम्ही म्हणतोय. मग तुम्ही काय नाही करुन देत.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९ करिता दोन ठराव आलेले आहेत. दोन्ही ठरावांचे वाचन करतो पहिला ठराव जुबेर इनामदार यांचा आहे आणि दुसरा ठराव ओमप्रकाश अग्रवाल यांचा आहे. जुबेर इनामदार यांचा ठराव वाचतो. मा. महासभा दिनांक २२/१२/२०१० मध्ये विषय पटलावर आणलेला विषय पुढच्या मा. महासभेमध्ये घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे. दुसरा ठराव श्री. ओमप्रकाश यांचा असून त्याचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि. १०/१२/२०१० मधील प्रकरण क्र. ६९ ह्या विषया वरील चर्चा आजच्या महासभेतच व्हावा. तो पुढील महासभेमध्ये चर्चेसाठी घेवू नये असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, एक सुचना आहे की ७० नंबरचा अनुदानाचा जो विषय......

**नगरसचिव :-**

ठराव मताला टाकलेला आहे या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक ओमप्रकाश अग्रवाल, अनुमोदक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात कोण असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्था कोण असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री जुबेर इनामदार आणि अनुमोदक श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेल्या

ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात कोण असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोण नाहीत.

**मा. महापौर :-**

श्री. जुबेर इनामदार यांच्या बाजुने ४३ मते पडलेली आहे आणि श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना २० मते पडलेली आहेत. जुबेर इनामदार यांची सुचना मंजूर झालेली आहे.

**प्रकरण क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचा ठेका मुदतपूर्व रद्द करणेबाबत.

**ठराव क्र. ७० :-**

मा. महासभा दिनांक २२/१२/२०१० मध्ये विषय पटलावर आणलेला विषय पुढच्या मा. महासभेमध्ये घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | भोईर राजु यशवंत | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | जाधव मोहन महादेव | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | सिंह मदन उदितनारायण | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | पाटील शरद केशव | |
| ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ९ | सुनिता शशिकांत भोईर | ९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | पांडे स्नेहा शैलेश | |
| ११ | जंगम लक्ष्मण गणपत | ११ | यादव मिरादेवी रामलाल | |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १२ | प्रविण मोरश्वर पाटील | |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | १३ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १४ | श्री. वासुदेव भास्कर मुंज | १४ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १५ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | १५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १६ | प्रमोद जयराम सामंत | १६ | म्हात्रे मोहन गोपाळ | |
| १७ | मर्लिन मर्विन डिसा | १७ | गणेश गोपाळ शेट्टी | |
| १८ | वैती विजया हेमचंद्र | १८ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| १९ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | १९ | व्यास सुधा वासुदेव | |
| २० | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | २० | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २१ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २२ | भट दिप्ती शेखर | | | |
| २३ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २४ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २५ | शेख सलिम दाउद | | | |
| २६ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २७ | मिलन वसंत म्हात्रे | | | |
| २८ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| २९ | धनेश परशुराम पाटील | | | |
| ३० | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३१ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३२ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३३ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३४ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| ३५ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३६ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ३७ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | | | |
| ३८ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ३९ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४१ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४२ | पाटील अनिता जयवंत | | | |
| ४३ | परेरा टेरी पॉल | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७०, ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाकरीता अनुदान देणेबाबत.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब, मुझे एक प्रश्न करना है दादा एक मिनिट महत्वाचा विषय आहे. आज ये अधिकारी ऐसा करते है अगर कोई भी जनप्रतिनिधी पब्लिक के कम्प्लेंट पत्र देते है तो पत्र की कॉपी जिसके खिलाफ कंम्प्लेंट किया गया उसके हाथ मे कैसा पडता है। ये किस अधिकारीने किया है। पत्र बाहर कैसे गया?

**मधुसुदन पुरोहित :-**

आयुक्त साहेब, या विषयावर मला पण दोन मिनिट बोलायचे आहे. आम्ही महापालिकेला पत्र देतो ते पत्र संबंधीत अधिकारी त्या ठेकेदराच्या हातात देतो आणि त्या ठेकेदाराचा मुकादम आमच्या घरी येतो आणि सांगतो साहेब ही कामे झालेली आहेत. म्हणून तुम्ही सही करा. काम झालेलीच नसतात. आम्ही त्या अधिका-याला फोन करतो तिकडचे काम झाले नाही. हा पत्र घेऊन येणारा त्यांचा मुकादम कोण आहे? आणि म्हणतो साहेब चुकीने झालेले आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

विषय कुठला आहे?

**भगवती शर्मा :-**

त्या विषयावर चर्चा होत नाही.

**प्रभात पाटील :-**

अनैतिक शब्द वापरला.......

(सभागृहात गोंधळ)

**स्नेहा पांडे :-**

हनुमान नगर परिसर मे एक इललिगल बिल्डींग है। उस मे एम.बी.एम.सी. तीन बार तोडकर कारवाई कर चुकी फिर भी वो बिल्डींग खडी है और उस बिल्डींग मे सब भाडे पे दिये जा रहे है।

**मा. महापौर :-**

ये अगले मिटींग मे विषय है।

**स्नेहा पांडे :-**

एक मिनिट, आज मेरे साथ हुआ है। कल आपके साथ भी हो सकता है।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

एक बात ध्यान मे रखिए। यह सभा तहकुब हुई थी। तहकुब सभा मे और कोई सब्जेक्ट नही लेनेका।

**स्नेहा पांडे :-**

लेकीन दादा पत्र कम्प्लेट बाहर गया।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

इसके बारेमे आप कमिशनर साहबसे मिलिए। उनके साथ बात किजीए।

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब के यहा कल पहुचे इसलीए मैने रख है। ये पत्र बाहर कैसे गया है।

**प्रभात पाटील :-**

दि. २५, २६, व २७ डिसेंबर २०१० रोजी ठाणे येथे ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सपन्न होणार आहे हे संमेलन मराठी साहित्य सृष्टीत मानाचे व ठाण्यांचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठ्या प्रमाणावर साहित्यीक, नाटककार, कवी आदि उपस्थित राहणार आहेत. संमेलनातुन मराठी साहित्य जनेतसमोर ठेवण्याचे दृष्टीने संमेलन हे एक उत्तम व्यासपीठ आहे. त्या संमेलनासाठी अंदाजे २ कोटी खर्च अपेक्षित असून परिषदेस आर्थिक निकड असल्याकारणाने महाराष्ट्र शासनाने त्यांना २५ लाख मदत केलेली आहे. ठाणे महानगरपालिका ही सहप्रायोजक असून साहित्य संमेलनास रु. ६५.०० लाखाची आर्थिक मदत केली आहे. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यात अन्य नगरपालिका / महानगरपालिका यांनी सुध्दा त्यांचे परिने आर्थिक मदत केली आहे. त्यामुळे ठाणे येथे होणा-या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून रु. ५.०० लाख अनुदान देणेस मान्यता देण्यात येत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**अरुण कदम :-**

ह्याच्यामध्ये मराठी साहित्य संमेलनासाठी ५ लाखा ऐवजी १० लाख अनुदान द्यावे. अशी मी उपसुचना करीत आहे.

**प्रविण पाटील :-**

त्याला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

५ लाखाच्या ठरावास अनुमोदन झालेल आहे आणि हा ठराव मंजूर झालेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आमचीपण सूचना आहे. घ्यायची तर घ्या नाहीतर नका घेऊ. अजून ठराव वरती पोहचला नाही आणि मंजूर झाला. सचिव साहेब ठराव वाचा.

**अरुण कदम :-**

आमची सूचना घेता की नाही घेता.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपणांकडून शिफारस करण्यात आलेले रु. ५.०० लक्ष एवढे अनुदान वाढवून रुपये १०.०० लक्ष करण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

कोकण मराठी साहित्य संमेलन जे झाल होत त्याला आपण ५ लाखाच दिले होते आणि महापालिकेची आर्थिक परिस्थिती बघता ५ लाख योग्य आहे असे सभागृहाचे मत आहे.

**प्रविण पाटील :-**

हे अखिल भारतीय साहित्य संमेलन आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

फक्त नावात बदल होतो. हे साहित्य संमेलनच आहे. अखिल भारतीय असल तरी ते मराठी माणसाचच आहे.

**अरुण कदम :-**

या संमेलनाचे जे प्रायोजक होते त्यांनी आपले प्रायोजकत्व मागे घेतले ते मागे घेतल्यामुळे त्यांना फार आर्थिक अडचणींना सामोरे जाव लागल आहे. सन्मा. डावखरे साहेबांनी याचा पुढाकार घेतल्यामुळे त्यांना तेवढ करता आलेल आहे. नाहीतर त्यांची हालाखीची परिस्थिती आहे. त्यांना अजुन पैशाची आवश्यकता आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांना भरपूर आवश्यकता आहे. पण आपल्याला आवश्यकता आहे निधीची.

**अरुण कदम :-**

आपल्याकडे भरपूर आहे आपल्याला ५ लाखाने आपल्याला जास्त फरक पडेल असे वाटत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला पत्र देतो की बचत कशी करायची ती

**प्रविण पाटील :-**

सर्व महापालिकेने मदत केलेली आहे साहेब.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

वसई विरार महापालिकेतील माझ्या माहितीप्रमाणे पदाधिका-यांनी वैयक्तिक पैसे दिलेले आहेत. ही चांगली गोष्ट आहे, अभिमानास्पद गोष्ट आहे. माजी महापौर आहेत त्यांनी द्यावे चार-पाच लाख रुपये चांगली गोष्ट आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही मानधन देऊ तुम्ही सहयोग केला तरी खुप आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही मराठी साहित्य संमेलनाला जर पैसे दिले तर त्याचा एक वेगळा भाग येईल, वेटेज येईल.

**नरेंद्र मेहता :-**

माझे जे काही मॅक्झीमम डोनेशन जाते ते मराठी व्यक्तीलाच जाते.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मग इकडे किती देता आपण? जाहिर करुन टाकतो.

**नरेंद्र मेहता :-**

आवश्यकता काय आहे? मी सक्षम आहे ना. वैयक्तिकरित्या नाही. दादा, महापालिकेचा विषय आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, मेहता साहबने बहुत अच्छी बात बोली है की मॅक्झीमम डोनेशन मराठी लोगोंको जाता है। लेकीन ये गर्व वाली बात भी है। लेकीन ये माध्यम बोला ये सत्यता नही है। तो वह इसको सत्य को प्रमाणित करने के पुरे सालभर का डोनेशन एक पुरा लिस्ट महासभा मे दिजीए।

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना सांगा तो अधिकार नाही.

**राजेंद्र जैन :-**

आपने बोला है।

**लक्ष्मण जंगम :-**

उसके उपर नाम देखकर आपको मालूम पडेगा की कितने मराठी मे इन्व्होल है वो।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

इकडे टॅक्स वाढले म्हणून बोंबाबोब करतो. जनतेच्या पैशाचा विनियोग व्हायला पाहिजे.

**अरुण कदम :-**

साहेब बोलण्यासारख बरच काही आहे. पैसा कुठे जातो. त्याचापण करूना विचार आपण.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७० करता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक प्रभात पाटील, अनुमोदक भगवती शर्मा, दुसरा ठराव सुचक प्रेमनाथ पाटील, अनुमोदक प्रविण मोरेश्वर पाटील मी अनुक्रमे दुसरा ठराव मतास टाकतो. आपणास शिफारस करण्यात येते की, रू. ५ लक्ष एवढे अनुदान वाढवून त्याऐवजी १० लक्ष अनुदान करण्यात यावे अशी मी सुचना करण्यात आहे. सुचनेच्या बाजूने जे आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाचा विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे. सूचक प्रभात पाटील अनुमोदक भगवती शर्मा दि. २५, २६, व २७ डिसेंबर २०१० रोजी ठाणे येथे ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सपन्न होणार आहे हे संमेलन मराठी साहित्य सृष्टीत मानाचे व ठाण्यांचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठ्या प्रमाणावर साहित्यीक, नाटककार, कवी आदि उपस्थित राहणार आहेत. संमेलनातुन मराठी साहित्य जनेतसमोर ठेवण्याचे दृष्टीने संमेलन हे एक उत्तम व्यासपीठ आहे. त्या संमेलनासाठी अंदाजे २ कोटी खर्च अपेक्षित असून परिषदेस आर्थिक निकड असल्याकारणाने महाराष्ट्र शासनाने त्यांना २५ लाख मदत केलेली आहे. ठाणे महानगरपालिका ही सहप्रायोजक असून साहित्य संमेलनास रु. ६५.०० लाखाची आर्थिक मदत केली आहे. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यात अन्य नगरपालिका / महानगरपालिका यांनी सुध्दा त्यांचे परिने आर्थिक मदत केली आहे. त्यामुळे ठाणे येथे होणाऱ्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून रु. ५.०० लाख अनुदान देणेस मान्यता देण्यात येत आहे. ठरावाच्या बाजूनी असलेल्यांनी हात वर करायचे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करा.

**मा. महापौर :-**

भगवती शर्मा आणि प्रभात पाटील मॅडम यांच्या ठरावाला ४३ मते एकूण पडलेली आहेत. विरोधात २१ मते आहेत. प्रभात पाटील यांचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

**नगरसचिव :-**

हा ठराव कायम करण्यात आला आहे.

**प्रकरण क्र. ७० :-**

८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाकरीता अनुदान देणेबाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

दि. २५, २६, व २७ डिसेंबर २०१० रोजी ठाणे येथे ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सपन्न होणार आहे हे संमेलन मराठी साहित्य सृष्टीत मानाचे व ठाण्यांचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठ्या प्रमाणावर साहित्यीक, नाटककार, कवी आदि उपस्थित राहणार आहेत. संमेलनातुन मराठी साहित्य जनेतसमोर ठेवण्याचे दृष्टीने संमेलन हे एक उत्तम व्यासपीठ आहे. त्या संमेलनासाठी अंदाजे २ कोटी खर्च अपेक्षित असून परिषदेस आर्थिक निकड असल्याकारणाने महाराष्ट्र शासनाने त्यांना २५ लाख मदत केलेली आहे. ठाणे महानगरपालिका ही सहप्रायोजक असून साहित्य संमेलनास रु. ६५.०० लाखाची आर्थिक मदत केली आहे. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यात अन्य नगरपालिका / महानगरपालिका यांनी सुध्दा त्यांचे परिने आर्थिक मदत केली आहे. त्यामुळे ठाणे येथे होणाऱ्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून रु. ५.०० लाख अनुदान देणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | भोईर राजु यशवंत | **निरंक** |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | जाधव मोहन महादेव | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | सिंह मदन उदितनारायण | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | पाटील शरद केशव | |
| ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ९ | सुनिता शशिकांत भोईर | ९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | पांडे स्नेहा शैलेश | |
| ११ | जंगम लक्ष्मण गणपत | ११ | यादव मिरादेवी रामलाल | |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १२ | प्रविण मोरश्वर पाटील | |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | १३ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १४ | श्री. वासुदेव भास्कर मुंज | १४ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | १५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १६ | प्रमोद जयराम सामंत | १६ | म्हात्रे मोहन गोपाळ | |
| १७ | मर्लिन मर्विन डिसा | १७ | गणेश गोपाळ शेट्टी | |
| १८ | वैती विजया हेमचंद्र | १८ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| १९ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | १९ | व्यास सुधा वासुदेव | |
| २० | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | २० | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २१ | मोदी चंद्रकांत भिकालाल | २१ | मिलन वसंत म्हात्रे | |
| २२ | भट दिप्ती शेखर | | | |
| २३ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २४ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २५ | शेख सलिम दाउद | | | |
| २६ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २७ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| २८ | धनेश परशुराम पाटील | | | |
| २९ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३० | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३१ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३२ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३३ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| ३४ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३५ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ३६ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३७ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | | | |
| ३८ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ३९ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४० | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४१ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४२ | पाटील अनिता जयवंत | | | |
| ४३ | परेरा टेरी पॉल | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब ठराव अगोदर मंजूर झालेला आहे. दोन वाजता परत त्याला ठरावाची आवश्यकता नाही. सर्वानुमते मंजूर झालेला आहे. दोन वाजता.

**कल्पना म्हात्रे :-**

महापौरांनी मंजूर केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

झाली दोन वाजता, काय झाली सचिवांनी सांगाव.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब पुढची सभा दोन तारखेनंतर घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

आपण मान्य केलेले आहे. आपण निर्णय दिलेला आहे की, दोन वाजता सभा तहकुब करणार. सचिव साहेब सांगा त्यांना.

**दिनेश नलावडे :-**

पुढचा विषय घ्याना. हे विषय संपून टाका.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब आपण २ वाजताची जबान दिली आहे. आपली जबान फिरत नाही म्हणून बोलतो.

**मा. महापौर :-**

जबान दिली पण बोलत राहिलत ह्या विषयावरती.

**नरेंद्र मेहता :-**

बोलायचा आमचा अधिकार आहे.

**राजेंद्र जैन :-**

महापौर साहेब समाज के हित मे इतना जो खर्च होता है वो इकठ्ठे होते है क्या?

**मा. महापौर :-**

सभागृहाच्या दृष्टीप्रमाणे ही सभा तहकुब करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, परत सभा कधी लावणार? कमीत कमी तीन दिवस अगोदर नोटीस द्या. आपण एक दिवसाची नोटीस देता तेव्हा आम्ही जागेवर नसतो. मग मिटींग लागते.

**मा. महापौर :-**

ह्याच्या आधी राहिलेले बाकीचे विषय घेऊन नविन विषय आणखीन घेऊन.......

**नरेंद्र मेहता :-**

ठराव तहकुब सभेसाठी झालेल्या आहे सभा. रद्द करण्यासाठी झालेला नाही. सचिव साहेब आपण माहिती द्या.

**मा. महापौर :-**

कोणी ठराव केलेला आहे. ठराव झालेला नाही.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

तहकुबचा ठराव झालेला आहे. सचिवांनी ठराव वाचलेला आहे.

**मा. महापौर :-**

पटलावर नविन विषय घेऊन सभा घेण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब असे होत नाही. तुम्हाला रद्द करायला पण ठराव लागतो.

**नगरसचिव :-**

संपूर्ण महापौरांचे अधिकार आहेत. सभागृह आणि महापौरांचा अधिकार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाचा आहे महापौरांचा नाही. सभागृहाने ठराव दिला ना. दोन वाजता बंद करण्याच महापौरांनी रूलींग दिलेले आहे.

**नगरसचिव :-**

सभागृहाचा अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

सगळ्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे रहा.

(राष्ट्रगीताला सुरूवात झाली.)

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.१५ वा.**

**सही/-**<br>**महापौर**<br>**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**<br>**मिरा भाईंदर महानगरपालिका**